शनिवार, १० डिसेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -११६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●SATURDAY 10 DECEMBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-116 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5

## मेंडोस : महाराष्ट्रात पावसाची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** मेंडोस चक्रीवादळाचा धोका महाराष्ट्राला बसण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरातून उठणाऱ्या मेंडोस चक्रीवादळ थैमान घालण्यास सुरूवात झाली आहे. 11 ते 14 डिसेंबरदरम्यान महाराष्ट्रातील काही ठिकणी हवामानात बदल झाल्याने पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान पुद्दुचेरी, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये हवामान खात्याने हाय अलर्ट जारी केला आहे. या चक्रीवादळामुळे तिन्ही राज्यांमध्ये मुसळधार पावसासोबत वादळी वारेही वाहण्याची शक्यात हवामान विभागाने वर्तवली आहे.11 ते 14 डिसेंबरपर्यंत असे चार दिवस संपूर्ण महाराष्ट्रात चक्रीवादळामुळे मध्यम ते मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. चक्रीवादळाचा परिणाम नाशिक, खान्देश ओलांडून मध्य प्रदेशाच्या बेतुल, बऱ्हाणपूर, देवास, होशंगाबाद, मांडला व छत्तीसगडच्या काही भागापर्यंत जाणवू शकतो. दुसरीकडे महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून वाढलेले किमान तापमान व ढगाळ वातावरण पुढील 4-5 दिवस तसेच राहील, असे हवामान तज्ज्ञांनी सांगितले आहे.

# चार बायका असणे अनैसर्गिक

## नितीन गडकरी : समान नागरी कायदा देशाच्या प्रगतीसाठी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : चार बायका असणे हे अनैसर्गिक असल्याचे स्पष्ट मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले आहे. 'अजेंडा आज तक'च्या कार्यक्रमामध्ये बोलताना गडकरींनी हे विधान केले. आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्वा सरमा यांनी मुस्लीम समाजातील पुरुषांच्या एकापेक्षा जास्त पत्नी असण्याला भाजपाचा विरोध असल्याचे विधान जाहीर सभेत केल्याच्या दुसऱ्या दिवशीच गडकरींनी या मुद्द्यावर भाष्य केले आहे.**



गडकरी पुढे म्हणाले की, तुम्हाला असा एखादा मुस्लीम देश ठाऊक आहे का जिथे दोन नागरी कायदे आहेत? एखाद्या पुरुषाने महिलेशी लग्न केले तर ते नैसर्गिक आहे. मात्र एका पुरुषाने चौघींशी लग्न करणे हे अनैसर्गिक आहे. मुस्लीम समाजातील पुढारलेले आणि सुशिक्षित लोक चार लग्न करत नाहीत. समान नागरी कायदा हा एखाद्या धर्माविरोधात नाही. हा कायदा देशाच्या प्रगतीसाठी आहे, असे गडकरी म्हणाले. समान नागरी कायद्याकडे राजकीय दृष्टीकोनातून पाहू नये असेही गडकरींनी म्हटले आहे. देशातील गरीबांना या कायद्याचा फायदा होईल असा विश्वास गडकरींनी व्यक्त केला. केंद्र सरकार समान नागरी कायदा देशभरामध्ये लागू करण्यासाठी कायदा का आणत नाही असा प्रश्न गडकरींना विचारण्यात आला होता. या प्रश्नाला उत्तर देताना गडकरींनी हे विधान केले. तसेच सध्या हा विषय चर्चेत असून राज्य सरकारांनी साथ दिली तर या कायद्याचा देशाभरातील लोकांना फायदा होऊ शकतो, असे गडकरी म्हणाले. स्वतंत्र भारतात राहणाऱ्या कोणत्याही पुरुषाला तीन ते चार महिलांशी लग्न (पत्नीला घटस्फोट न देता) करण्याचा हक्क नाही. आम्हाला ही पद्धत बदलायची आहे. मुस्लीम महिलांना न्याय देण्यासाठी आपल्याला काम करावे लागेल, असे हेमंत बिस्वा सरमा यांनी भाषणादरम्यान म्हटले होते. हेमंत बिस्वा सरमा यांनी लोकसभा खासदार बदरुद्धीन अजमल यांना लक्ष्य करत हे विधान केले. 'एआययुडीएफ'चे प्रमुख असलेल्या अजमल यांच्या सल्ल्यानुसार महिला २० ते २५ बाळांना जन्म देऊ शकतात. पण त्यांचे अन्न, कपडे आणि शिक्षणावरील खर्च विरोधी नेत्यांनी करावा. समान नागरी कायदा हा भारतीय संवाधिनानुसार कायद्याच्या ४४ व्या कलमाअंतर्गत योतो. यामध्ये खासगी आयुष्याशी संबंधित कायद्यांचा समावेश आहे, जे सर्व भारतीयांना समानप्रकारे लागू असतील. यामध्ये जात, धर्म, लिंग यासारखा भेदभाव केला जाणार नाही. लग्न, घटस्फोट, दत्तक घेणे यासारख्या गोष्टींचा या कायद्यांमध्ये समावेश होतो.

# न्याय मिळेल ?



श्रद्धा वालकरचे वडिल विकास वालकर आणि कुटुंबीयांनी शुक्रवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सागर निवासस्थानी भेट घेतली. श्रद्धाच्या कुटुंबीयांना न्याय मिळेल, असे देवेंद्र फडणवीस यांनी आश्वस्त केले. माजी खा. किरिट सोमय्या यावेळी उपस्थित होते.

# तुम्हाला जाहिराती पाहायच्या नसतील तर पाहू नका

## सुप्रीम कोर्टाने विद्यार्थ्याला झापले

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** युट्युबवरील अश्लील जाहिरातीमुळे पोलीस भरतीच्या परीक्षेत नापास झाल्याचा दावा एका विद्यार्थ्याने केला आहे. या विद्यार्थ्याने गुगलकडे 75 लाख रुपयांची नुकसान भरपाईची मागणी केली. यासाठी हा विद्यार्थी चक्क सुप्रीम कोर्टात पोहचला होता. या प्रकरणी सुप्रीम कोर्टाने तुम्हाला जाहिराती पाहायच्या नसतील तर पाहू नका असे, म्हणत विद्यार्थ्याला चांगलेच झापले असून कोर्टाचा वेळ वाया घालवला म्हणून दंडही केला आहे. मध्य प्रदेशमधील एका तरुणाने गुगल विरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. त्याच्या मते पोलीस भरतीची तयारी करताना येणाऱ्या अश्लील जाहिरातीमुळे लक्ष विचलीत झाले. त्यामुळे परिक्षेत नापास झालो. मला 75 लाख रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, असे याचिकाकर्त्या विद्यार्थ्याने कोर्टात दावा केला होता.

मध्य प्रदेशमधील पन्ना येथे राहणाऱ्या आनंद किशोर चौधरी याने सुप्रीम कोर्टात याचिका केली होती. त्याने आपल्या याचिकेत म्हटले की, पोलीस भरती आणि राज्य सेवा परीक्षेची तयारी करत होतो. त्यासाठी युट्युबचा वापर करत होता. पण युट्युबवर वारंवार अश्लील जाहिराती येत होत्या. त्यामुळे लक्ष विचलीत झाले अन् परिक्षेत नापास झालो. त्यामुळे गुगल इंडियाने 75 लाख रुपयांची नुकसान भरपाई द्यावी.

आनंद चौधरी याच्या याचिकेवर सुप्रीम कोर्टाचे न्यायमुर्ती संजय किशन कौल आणि अभय एस ओका यांनी नाराजी व्यक्त केली. न्यायमुर्ती कौल म्हणाले की, 'तुम्हाला जाहिराती पाहायच्या नसतील तर पाहू नका. याप्रकराच्या याचिका करुन कोर्टाचा वेळ वाया घालवू नका. कोर्टाचा वेळ वाया घालवला म्हणून तुम्हाला एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात येत आहे'

याचिकाकर्त्याला 25 हजारांचा दंड - सुप्रीम कोर्टातील न्यायमुर्तीची नाराजी पाहून याचिकाकर्त्याने माफीची मागणी केली. यावर कौल म्हणाले की, 'दंडाची रक्कम कमी करत आहोत. पण माफी मिळणार नाही.' कोर्टाने याचिकाकर्त्याला 25 हजार रुपयांचा दंड ठोठावला. यावर याचिकाकर्त्यानं बेरोजगार असल्याचे कोर्टाला सांगितलं. त्यावर आम्ही कोर्टाने आम्ही कोणत्याही परिस्थितीत दंड वसूल करु, असे कोर्टाने याचिकाकर्त्याला सांगितले.

# शहांची 14 डिसेंबरला शिंदे-बोम्मईसोबत चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाच्या मुद्यावरुन महाविकास आघाडीच्या खासदारांनी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या खासदारांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांची अमित शाह यांच्याकडे तक्रार केली आहे. अमित शाह हे येत्या 14 डिसेंबरला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्याशी चर्चा करणार असल्याची माहिती खासदारांनी दिली. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर परस्पर समन्वयाने तोडगा काढू असे आश्वासन गृहमंत्र्यांनी दिल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे यांनी दिली.


सीमावादाचे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असताना कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून सातत्याने वक्तव्य केली जात असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे म्हणाले. महाराष्ट्रातील वाहनांवर हल्ले केले जात आहेत. तसेच राज्यातील मंत्र्यांना कर्नाटकमध्ये येण्यापासून रोखलं जात आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारानुसार देशात कुठेही जाण्याचा हक्क आहे. याला अडकाठी केली जात आहे. याबाबतच्या सर्व तक्रारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना सांगितल्याची माहिती अमोल कोल्हे यांनी दिली. अमित शाह यांनी खासदारांची बाजू संवेदनशीलपणे एकूण घेतल्यामुळं त्यांचे अमोल कोल्हे यांनी त्यांचे आभार मानले. बेळगाव, निपाणी, कारवार, बिदर या सगळ्या सीमाभागात आपला मराठी बांधव आहे. या मराठी बांधवांवर सातत्याने अत्याचार होत आहेत. त्यांच्यावर कानडी वरवंटा फिरवला जात आहे.

# घनसावंगीत आजपासून साहित्याचा जागर

## 42 वे मराठवाडा साहित्य संमेलन : उद्धव ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

घनसावंगी : स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळ शहागड संचलित संत रामदास कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय घनसांगवी जिल्हा जालना रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित मराठवाडा साहित्य परिषदेचे 42 वे मराठवाडा साहित्य संमेलन घनसावंगी येथे 10 व 11 डिसेंबर रोजी होत आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष शेषराव मोहिते आहेत. माजी आमदार शिवाजी चोथे संमेलनाचे स्वागत अध्यक्ष यांच्या अधिपत्याखाली हे संमेलन होत आहे.






ग्रामीण भागात होत असलेले हे 42 वे साहित्य संमेलन ही एक दुर्मिळ आणि ऐतिहासिक अशी बाब आहे. मराठीच्या आद्य कवियत्री असणाऱ्या महदंबा यांच्या जन्मस्थळ असणाऱ्या घनसांवगी तालुक्यात हे संमेलन सन्मानाची बाब आहे. नवोदित लेखकांसाठी तथा समाजासाठी एक वैचारिक मेजवानी या निमित्ताने अनुभवास मिळणार आहे. मुळात घनसावंगी तालुका हा साहित्यिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न आहे. संत रामदास स्वामी, मराठी आद्य कवयित्री महदंबा तसेच साहित्यकांचे मराठी साहित्यात खूप मोठे योगदान आहे. बाल, युवा तथा वृद्धांसाठी विशेष वैचारिक मेजवानी असणार आहे. साहित्याचा संस्कार या निमित्ताने मिळणार आहे. या निमित्ताने महाराष्ट्र शासन तथा मराठी भाषा साहित्य मंडळाने आद्य कवयित्री महदंबा यांच्या जन्मस्थळ रामसगाव येथे संतपीठ स्थापन करण्याची गरज आहे. -डॉ. कन्नूलाल विटोरे



"ग्रामीण भागात साहित्याचा जागर होणे ही सन्मानाची बाब आहे. त्यात राज्यस्तरीय संमेलन घनसांगीत होणे ही खरंतर विशेष आहे. कोरोना नंतरच्या काळात बदललेली मानसिकता, सामाजिक चिंतन, साहित्यिकांच्या रचना मधून व्यक्त होईल व त्यातून एक नव विचार अनुभवयास मिळेल.
-डॉ. बाळासाहेब सोनवणे



मुळात या साहित्य संमेलनामध्ये मला ज्या कवी आणि साहित्यकारांना मी पुस्तकांमध्ये वाचले होते किंवा इतर माध्यमातून पाहिले होते त्यांना जवळून पाहण्याचा अनुभवण्याचा आणि ऐकण्याची संधी मला या निमित्ताने मिळणार आहे. लेखन क्षेत्रात परिपूर्णतेसाठी तसेच एक मौलिक मूल्यवान विचार प्राप्त होण्यासाठी या संमेलनाची मदत होणार आहे. यात मी सहभाग घेणार आहे. ही एक अनुपम संधी आहे. तसेच माझ्यासारख्या नवोदित कवीसाठी एक उत्सव आहे.
-विश्वजीत खोजे






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## फक्त आणि फक्त कृतज्ञता

आधुनिक केसरी

त्यांच्या घराचा पत्ता त्यांनी सांगितला होता पण आम्हाला ते गाव तसे अपरिचित असल्याने आम्ही त्यांनी सांगितलेल्या एका ठिकाणी थांबलो. त्यांनी त्यांच्याकडे काम करणाऱ्या एका व्यक्तीला आम्हाला घेण्यासाठी पाठवले. तो पुढे आणि त्याच्यामागे आमची गाडी असे आम्ही जाऊ लागलो. गाडी अगदी हळू होती. त्याच सुमारास माझ्या बाजूने एक मुलगा मोटारसायकलवरून पुढे गेला. आमच्या गाडीचा धक्का त्याला लागेल असे वाटल्याने मी ब्रेक दाबला पण अचानक काय झाले ते कळले नाही. अचानक गाडीचा वेग वाढला आणि त्या बाईकस्वाराला गाडीने जोरदार धक्का दिला. बहुधा माझा पाय ब्रेकऐवजी चुकून अक्सिलेटरवर गेला असावा. मी त्या बाइकस्वाराला वाचवण्यासाठी अजून जोराने ब्रेक दाबला पण हायरे दैवा गाडीचा वेग अजूनच भयानक वाढला आणि मी पुढील दुर्घटना टाळण्यासाठी गाडी जोराने डाव्या बाजूला वळवली. मला काही कळण्याच्या आतच धाडकन आवाज झाला. जोराचा धक्का बसला.



गाडी कशाला तरी जोरात धडकली होती. गाडीत एक क्षण धूर आणि जळका वास येऊ लागला. तो क्षण इतका भयकंर होता की आम्हाला वाटले बस आता सगळे संपले. हा आपल्या आयुष्यातील शेवटचाच क्षण. थोड्याच वेळात आम्ही भानावर आलो. भोवताली गर्दी जमली होती. सुदैवाने गाडीचे दोन्ही दरवाजे उघडले. आम्ही बाहेर आलो. मृत्यूचे दर्शन घेऊन आम्ही जणू बाहेर आलो होतो. गाडीच्या पुढील दोन्ही एअरबॅग्ज उघडल्या गेल्या होत्या. त्यामुळेच आम्ही बचावलो होतो. गाडी जवळच असलेल्या मंगल कार्यालयाच्या संरक्षक भिंतीला धडकून थांबली होती. गाडीच्या पुढच्या भागाचे बरेच नुकसान झाले होते. गाडीची ती भयानक अवस्था पाहून आम्हालाही प्रचंड धक्का बसला. माझ्या गाडीला मी एक निर्जीव वाहन म्हणून कधीच पाहिले नव्हते. मी कुठूनही लांब जाऊन आलो की तिला स्पर्श करून मला सुखरूप आणल्याबद्दल तिचे मनोमन आभार मानत असे. आजही तिने मला वाचवले होते. माझ्यावरील संकट जणू तिने स्वतःवर घेतले होते. सीटबेल्ट लावल्याने आणि गाडीच्या दोन्ही एअरबॅग्स ओपन झाल्याने आमचे प्राण वाचले होते. **क्रमशः**



## आनंदी पहाट

## अध्यात्माचे तीन पैलू महत्वाचे

आधुनिक केसरी

सध्याची परिस्थिती, त्या परिस्थितील सर्व सामान्य मनुष्य, त्यांच्या अडीअडचणी, त्या अडचणींच्या निवारणार्थ शोधात असलेल्यांची मानसिकता ह्या विषयांचा सविस्तर खुलासा करून घेणे अधिक आवश्यक आहे. ह्या गुरुतत्वात सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची योग्य दिशा प्राप्त होत असते. ज्यायोगे सर्वत्र सकारात्मक वातावरणाची निर्मिती होत राहते. आपण प्रत्येकाने आपल्या आध्यात्मिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत. आध्यात्म हा मानसिक आणि शारीरिक उपचारांचा अविभाज्य घटक आहे. आध्यात्म संकट समयी अंतर्गत शक्तीचा स्त्रोत असल्याचे आपण जाणून घेतले पाहिजे. ते आपल्या कल्याणाच्या केंद्रस्थानी असून आपल्या जीवनातील सर्व पैलूना समृद्ध करते. शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नातेसंबंध दृढ करण्यास उपयुक्त ठरते. आपल्या कौटुंबिक गरजांसाठी व्यावहारिक, समजूतदार आणि शांत दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. आपल्या अंतःप्रेरणेवर आत्मविश्वास देते आणि यशाकडे जाण्यासाठी आवश्यक ती शक्ती प्रदान करते. आध्यात्मिक तंदुरुस्ती, उद्देश निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाची पायरी म्हणजे स्व-मूल्यांकन करणे होय. आपल्या जीवनाचे सात परिमाण समृद्ध करण्यासाठी वैयक्तिक योजना करण्याची गरज असते. आपले मन, शरीर, आत्मा, प्रेम, कार्य, खेळ, जग ह्याचा त्याच्याशी थेट संबंध असतो. अध्यात्म तीन पैलूंनी बनलेले आहे; नातेसंबंध, मूल्ये आणि जीवनाचा उद्देश हे होत. आध्यात्मात भावना, संवेदना किंवा असा विश्वास आहे की, माझ्यापेक्षा काहीतरी मोठे आहे, संवेदनात्मक अनुभवापेक्षा मानव असण्यापेक्षा काहीतरी अधिक आहे आणि ज्याचा आपण भाग आहोत. त्यामागचे कारण, तो वैश्विक किंवा दैवी निसर्ग हे आहे. आध्यात्म आपल्या चांगल्या भविष्यासाठी आपला दृष्टीकोन मजबूत करते. जीवनात आपल्याला नेहमीच आव्हानांचा सामना करावा लागतो, परंतु त्या कठीण काळात आपण आशावादी राहिलो तर निश्चितच सक्षम होऊ शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## श्वासाची या वारी | डोलु लागे||

देवळाच्या दारी | मौन झाली वारी ||
माझा हा श्रीहरि | सापडेना.||१||
भक्तीचिया संगे | भाव व्याकुळला ||
अंत तू विठ्ठला | पाहू नको.||२||
जन्माचेच नाते | तुझ्याशी रे देवा ||
अबोला केशवा | सोड आता.|| ३ ||
झंकारता विणा | आत्मा राम वदे ||
अंतरात नांदे | विठु माझा.||४||
पाणावले नेत्र | देह हा पंढरी ||
श्वासाची या वारी | डोलु लागे.||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


### भक्ती

तुला नित्य सांभाळिलेसे तिने रे
तुला नित्य संरक्षिलेसे तिने रे |
असे नित्य पाठी, तुझी कामधेनु
तरी का करीशी, मनी काळजी रे ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## विषय, वासना, इत्यादि सोडून भगवंताला शरण जावे



आधुनिक केसरी

भगवंताचे अस्तित्व जिथे पाहावे तिथे आहे. भगवंताचे मर्म ओळखायला, मी कसे वागावे हे प्रथम पाहावे. भगवंत आहे की नाही हे जाणण्याकरिता आपल्याला बुद्धी दिलेली आहे. भगवंत निश्चित आहे हे काहींना अनुभवाने कळले. आपण त्यांचे आप्तवाक्य प्रमाण मानले. भगवंताचे अस्तित्व जर निश्चित आहे तर त्याची ओळख तरी कशी करून घ्यावी ? बीजगणितामध्ये उदाहरण सोडविताना एक अज्ञात 'क्ष' घ्यावा लागतो. उदाहरणाचे उत्तर येईपर्यंत त्या 'क्ष' ची खरी किंमत काय आहे हे आपल्याला कळत नाही. पण तो घेतल्याशिवाय चालत नाही. त्याप्रमाणे, जीवनाचे कोडे सोडविण्यासाठी आज अज्ञात असा भगवंत आपल्याला गृहीत धरलाच पाहिजे. त्या भगवंताचे खरे स्वरूप, जीवनाचे कोडे सुटेल त्यावेळी आपल्याला कळेल. खरोखर, जन्ममरणातून मुक्त होण्याचा मार्ग जो आपल्याला दाखवितो तो खरा आप्त. भगवंताला सर्वात अधिक काय आवडते हे संतांनी सांगून टाकले. ते म्हणजे ' आपण विषय, वासना इत्यादि सर्व काही सोडून भगवंताला शरण जावे. ' आपण नेहमी विषयांनाच शरण जातो. भगवंताला जो शरण गेला त्याला जगाची भितीच नाही उरत. सर्व चमत्कार करता येतात, पण भगवंताला शरण जाणे फार कठीण आहे. आपण जिना चढतो ते जिन्यासाठी नसून वरच्या मजल्यावर जाण्यासाठी असते. वरच्या मजल्यावर जाणे हे साध्य असून, जिना हे त्याचे साधन आहे. त्याप्रमाणे तीर्थयात्रा, व्रते, नेमधर्म ही साधने असून, परमेश्वरप्राप्ती हे आपले साध्य आहे. पण परमेश्वरप्राप्ती बाजूलाच राहिली आणि आपण साधनालाच घट्ट धरून बसलो आहोत याला काय करावे ? मूळ भगवंत हा निर्गुण, निराकार आणि अव्यक्त आहे, पण मनुष्य त्याला आपल्या कल्पनेमध्ये आणतो. आपल्या ठिकाणी असणारे गुण पूर्णत्वाने त्या भगवंताच्या ठिकाणी आहेत अशी आपण कल्पना करतो. याचा अर्थ असा की, आपण प्रथम भगवंताला जडामध्ये पाहतो, आणि मग त्याच्या नामाकडे जातो. भगवंताने केलेली ही सृष्टी, आहे तशीच सर्व जरूर आहे. तिच्यामध्ये बदल करायला नको, बदल आपल्यामध्ये करायला हवा. आपले सगळे जीवन जर भगवंताच्या हातामध्ये आहे, तर मग जीवनातल्या सर्व घडामोडी त्याच्याच हातात आहेत यात शंका कोणती ? झाडाच्या मुळांना पाणी घातले की त्याच्या सर्व भागांना ते पोहोचते, तसे, भगवंताचा विसर पडू न दिला म्हणजे सर्व काही बरोबर होते. भगवंत हवासा वाटणे, यामध्ये सर्व मर्म आहे. आत्मा हा समुद्रासारखा आहे; त्याचा अगदी लहान थेंब, त्याप्रमाणे हा जीव आहे. त्याची ओळख होऊन आत्म्याशी समरस होणे, हेच खरे तत्त्वज्ञान आहे. या आत्म्याचे नित्य स्मरण ठेवून आनंदात असावे.

**आजचे बोधवचन आहे –** संतांनी नामस्मरणरूपी नाव आपणास दिली आहे. त्यात विश्वासाने बसू. संत हे कर्णधार आहेत, ते आपणास पैलपार नेतील.श्रीराम समर्थ

## मनाचे श्लोक

आधुनिक केसरी


**देह्यादीक प्रपंच हा चिंतियेला।**
**परी अंतरी लोभ निश्चित ठेला।**
**हरीचिंतने मुक्तिकांता वरावी।**
**सदा संगती सज्जनाची धरावी।।१६५।।**

**श्लोकार्थ :** मनुष्य आपल्या देहाचे आणि मुलाबाळांचे म्हणजे आपल्या संसाराचे चिंतन करतो. पण त्यामुळे त्यांच्या अंतःकरणात प्रपंचाची आसक्ती घट्ट होत जाते. ते सोडून माणसाने भगवंताचे चिंतन केले तर त्यास मोक्ष प्राप्त होईल. पण हे साध्य होण्यासाठी आत्मबुद्धि स्थिरावलेल्या मनुष्याची नित्य संगत असावी.

**विवेचन :** मन हे सतत कसला न कसला विचार करीत असतेच. आपण सर्व संसारी माणसे असल्यामुळे आपल्या मनात साहजिकच संसाराचे म्हणजे मुलंबाळं, घर, नोकरी, नातेवाईक, मित्रमंडळी तसेच वैयक्तिक हेवेदावे आदी गोष्टींचे विचार येतजात असतात. पण त्याचा परिणाम असा होतो की आपल्याला संसार ( प्रपंच ) खरा वाटू लागतो. मनुष्याच्या मनात सतत प्रपंचाचा विचार चालू राहतो. जे पोटात असते तेच ओठात येते असे म्हणतात. मनुष्याच्या ध्यानी, मनी, चिंतनी सतत प्रपंच असल्याने, त्याला जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी प्रपंच दिसत असल्याने जरी भगवंत प्रसन्न झाला तरी मनुष्य मुक्ती न मागता प्रपंचातील वस्तू मागेल. याला कारण एकच, जे मनात ते ध्यानात आणि तेच व्यवहारात. सर्व संत उपजत ज्ञान घेऊन जन्माला आले होते असे म्हणता येणार नाही. संतांनी जितके प्रापंचिक दुःख सोसले त्याच्यापेक्षा आपले दुःख निश्चितच कमी आहे. आजपर्यंत कोणी आपल्यावर बहिष्कार टाकलेला नाही. आपल्यापैकी कोणाची अन्नअन्नदशा झालेली नाही. आपण कोणीच मोगलाई अनुभवलेली नाही. इतकी सारी दुःखे उराशी घेऊन सर्व संतांनी भगवतांच्या प्राप्तीची इच्छा ठेवली, नव्हे ते मिळण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला आणि ईश्वर कृपेने ते त्यात यशस्वीही झाले.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

माणूस प्रपंच करतो. फक्त स्वतःच्या देहाला जगवण्यासाठी केलेले प्रयास म्हणजे प्रपंच नाही. मी स्वतः तर आहेच, शिवाय मी ज्यांना माझे म्हणतो ते सारे, म्हणजे माझे आईवडील, पत्नी, अपत्ये, आप्त, मित्र अशा अनेकांचा समावेश असलेले आपले जीवन जगणे म्हणजे प्रपंच करणे. या साऱ्यांच्याबद्दल मनात लोभ



असल्यामुळे त्यांच्याही योगक्षेमाची चिंता करत मनुष्य प्रपंच करतो. मी म्हणजे माझा देह इथपासून वाढलेल्या या गोतावळ्याचा मोह, त्याच्याबद्दलचा लोभ मनात बाळगून त्याच्या ऐहिक सुखासाठीच्या म्हणजेच देहादिक प्रपंचाच्या चिंता वाहताना त्यात देवाला स्थान कोठे असते ? 'देखल्या देवा दंडवत' यातच ? देवाची पूजा करत असतानासुध्दा प्रापंचिक विचारांच्या भाऊगर्दीत ती पूजाही यांत्रिकतेने केल्यासारखीच केली जाते. मनुष्य जशी देवाची पूजा करतो, तशी पूजा जर कोणी आपली केली तर आपण त्याला कोणता आशीर्वाद देऊ, याचा विचार मनुष्याने करावा आणि आपल्या पूजेत आवश्यक तो बदल करावा. मनुष्य सातत्याने प्रपंचाचा विचार करीत असल्याने मृत्यू समीप आला तरी त्याला प्रपंचच आठवतो.

"अंत मति सो गति" या न्यायाने मनुष्य पुन्हा जीवन मरणाचा फेऱ्या मारीत रहातो. याला मुख्य कारण ठरते ते म्हणजे मनुष्याच्या प्रपंचाबद्दलचा लोभ. मनुष्य पत्नीवर जसे निरातिशय प्रेम करतो तसेच प्रेम प्रपंचाच्या चिंतांपासून मिळवायच्या मुक्तीवर करायला पाहिजे, असे समर्थ आपल्याला या श्लोकात सांगत आहेत. मागील काही श्लोकात याचा उल्लेख आलेला आहे, परंतु एकदा सांगून काम झाले असते इतक्या संतांना एवढी लिखापढी करावी लागली नसती.

मुक्तीचे चार प्रकार समर्थांनी दासबोधात सांगितले आहेत. चारी मुक्ती ज्याला मिळाल्या त्याच्या अत्यंतिक दुःखाची निवृत्ती होऊन परमोच्च सुखाची प्राप्त होती. मात्र या चारी मुक्ती मिळणं खूपच कठीण, दुरापास्त असल्याचा धाक पूर्वसुरींनी दाखवलेला आहे. प्रत्येक मुक्ती करण्यासाठी वेगवेगळया साधनेचा मार्ग सांगितलेला आहे. चार मुक्तींपैकी पहिली मुक्ती आहे सलोकता. ज्या लोकात देवाचं वास्तव्य असतं, त्या लोकांत प्रवेश मिळतो.



# ‘महाराष्ट्र केसरी’चा अधिकृत मान ‘संस्कृती प्रतिष्ठान’कडेच!

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्राच्या कुस्ती विश्वातील सर्वात प्रतिष्ठेची असणाऱ्या ६५ व्या ‘महाराष्ट्र केसरी’ स्पर्धेचे आयोजन करण्याचा मान संस्कृती प्रतिष्ठानला मिळाला आहे. या संदर्भात कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाची अधिकृत जबाबदारी संस्कृती प्रतिष्ठानला दिल्याचे पत्र भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष खा. ब्रिजभूषण सिंह यांच्याकडून स्वीकारल्याची माहिती संयोजक माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी दिली. स्पर्धेच्या तारखा आणि ठिकाण लवकरात लवकर कळवण्याच्या सूचना या पत्रात कुस्ती महासंघाने दिल्या आहेत.

नवी दिल्ली येथे बृजभूषण सिंह यांनी यांनी मोहोळ यांना हे पत्र दिले. यावेळी राज्य कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष खासदार रामदास तडस, पुणे जिल्हा कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष पै. संदीप भोंडवे, पुणे राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष योगेश दोडके समवेत होते. दरम्यान, ब्रिजभूषण सिंह यांना या स्पर्धेचे निमंत्रण देण्यात आले असून, ते त्यांनी स्वीकारले असल्याचेही मोहोळ यांनी नमूद केले. 'महाराष्ट्र केसरी' अधिकृतपणे कोण भरवणार याबाबत संभ्रम होता. मात्र, कुस्ती महासंघाने संस्कृती प्रतिष्ठानच्या आयोजनावर शिक्कामोर्तब केल्याने हा संभ्रम दूर झाला असून, महासंघाच्या अस्थायी समितीचे पदाधिकारी यासंदर्भातील कार्यभार पाहत आहेत.

महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे संस्थापक आणि ‘महाराष्ट्र केसरी’चे जनक स्व. मामासाहेब मोहोळ यांच्या कुटुंबियांकडे 'महाराष्ट्र केसरी'चे आयोजन येणे, ही निश्चितच समाधान देणारी बाब आहे. प्रत्येकाच्या आठवणीत राहील आणि कुस्तीला आणखी उंचीवर नेता येईल, अशा प्रकारचे आयोजन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न असेल. लवकरच महाराष्ट्र केसरी स्पर्धेचा सविस्तर कार्यक्रम जाहीर केला जाईल, असे मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

# सेंद्रिय पद्धतीने मिरची पिकाचे आयुष्य तब्बल ५ महिने वाढले

आधुनिक केसरी न्यूज



**शिरवाडे वाकद :** प्रचंड इच्छाशक्ती असली की माणूस प्रतिकूल परिस्थितीवरही चांगल्या पद्धतीने मात करू शकतो याचे आदर्शउदाहरण म्हणजे शिरवाडे येथीलशेळके बंधू. येथीलरमेशकेदु शेळके व सुरेश केदु शेळके यांनी आपल्या अत्यंत क्षारपड जमिनीत उत्तम टोमॅटो, मिरची व द्राक्षे पीक घेऊन इतर शेतकऱ्यांपुढे आदर्श निर्माण केला आहे.

शेळके बंधू यांची जमीन क्षारपड. पाणीही अत्यंत खराब. जमिनीचा सामू ११ च्या वर तसाच पाण्याचाही सामू १० च्या वर, त्यामुळे कोणत्याही पिकाची वाढ होत नसे. या जमिनीत केवळ जनावरांचा चारा व गहू हेच पीक येत होते. शेळके बंधूनी यावर अनेक कृषी तज्ञांचे मत घेतले. रासायनिक खतांचा वारेमाप वापर केला, महागडी रासायनिक औषधे फवारणी केली मात्र शेती उत्पादनात फारसा फरक पडला नाही. उत्पादन कमी व खर्च जास्त अशी परिस्थिती झाल्याने शेळके बंधूंची आर्थिक परिस्थिती खालावत गेली.

त्यामुळे शेळके बंधू हतबल झाले होते. नगदी पिकाशिवाय आर्थिक स्थिती सुधारणार नाही हे त्यांनी ओळखले. आणि या परिस्थितीवर मात करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी सर्वप्रथम गोदावरी कालव्यावरून गोड पाणी उपलब्ध केले व ते एक तळ्यात साठवले, त्यामुळे पाण्याचा प्रश्न काही अंशी सुटला तरी जमिनीचा सामू जास्त होता. पिकाला पाणी दिले तरी जमिनीवर पांढरा थर येत असे. धामोरी येथील सेंद्रिय शेती प्रसारक व श्री स्वामी समर्थ गांडुळ प्रकल्प ( धामोरी ) येथील सुनील शिंदे व कृषी शास्त्रज्ञ जगदीश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शेतीत सेंद्रिय पद्धतीचा अवलंब करण्याचा विचार केला. सेंद्रिय पद्धतीने त्यांनी दि.३ जून रोजी २५ गुंठे जमिनीत टोमॅटो लागवड केली. टोमॅटोला दोन टन शेणखत टाकून ट्रॅक्टरच्या साहाय्याने उभी आडवी फननी केली. त्यानंतर चार फुटावर मातीचे वरंबे तयार केले. त्यावर खतांचा मूळ डोस म्हणून रासायनिक खते न टाकता गांडूळ खत व इतर सेंद्रिय खते टाकली. बोदावर ठिबक सिंचनच्या सहाय्याने सिंचन व्यवस्था केली. ठिबक सिंचनामुळे अल्प पाण्याचा वापर करून ते फक्त मुळाशी कसे राहील याची व्यवस्था केली. त्यावर प्लॅस्टिकचे आच्छादन केले. टोमॅटो वाढीसाठी त्यांनी रासायनिक खतांचा वापर टाळून वेळोवेळी गांडुळ खत पाण्याचा वापर केला. त्यामुळे मुळांची संख्या भरपूर प्रमाणात वाढली. जिवामृताची फवारणी केली. त्यामुळे त्यांचे टोमॅटो पीक अवघ्या ५० दिवसांत बहरून आले आहे. गतवर्षी त्यांनी याच पद्धतीने एकरी सरासरी १२०० क्रेटस टोमॅटो उत्पादन काढले होते. मात्र यावर्षी त्यांनी सेंद्रिय पद्धतीने अवघ्या २५ गुंठ्यांत ९२५ क्रेट टोमॅटो उत्पादन काढून उच्चांक केला आहे.

दि.२६ जून रोजी त्यांनी नामधारी २१३२ मिरची २० गुंठे लागवड केली आहे. मिरची पिकासाठीही त्यांनी ठिबक सिंचन, प्लॅस्टिक आच्छादन व ८० टक्के सेंद्रिय पद्धतीचा अवलंब केला. त्यामुळे मिरची पीक बहरून आले आहे. एरवी तीन ते चार महिने चालणारे मिरची पीक तब्बल १० महिने चालेल असा अंदाज आहे. आजपर्यंत त्यांनी ७ टन उत्पादन घेतले असून ते १० टनांपर्यंत जाणार आहे. शेतीतील या बदलामुळे त्यांना चांगली आर्थिक आवक तर झालीच परंतु परिसरात हा चर्चेचा विषय तर झालाच मात्र त्यामुळे परिसरातील अनेक शेतकरी, औषध कंपन्या यांनी त्यांच्या शेतीला भेटी दिल्या त्याच बरोबर त्यांना पुरस्कारही मिळाले. यातून त्यांनी सेंद्रीय शेती ही काळाची गरज असून शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेतीकडे चला असा संदेश दिला आहे.

निसर्गाच्या अमूल्य अन्नपद्धतीत गांडुळांची भूमिका महत्त्वाची होती . सुपीक जमिनीत जीवाणूंच्या सहभागापेक्षा गांडुळे जास्त महत्त्वाची असतात, रासायनिक खतांमुळे जमिनीत उष्णता निर्माण झाल्यामुळे, गांडुळे खाली आणि खाली सरकतात, मल्टिप्लायर जमिनीत असे वातावरण निर्माण करतात, ज्यामुळे दुसऱ्या वर्षी गांडुळे वर येऊन खत बनवायला सुरुवात करतात, दरवर्षी एक एकर क्षेत्रात वर्षभर लागवड केलेल्या जमिनीत १२० टन गांडुळ खत बनते, त्यामुळे बाहेरून एक रुपयाचे सुद्धा खत टाकण्याची गरज नाही . **–सुनील शिंदे, सेंद्रिय शेती मार्गदर्शक**


द्राक्षे शेती ही पूर्णपणे रासायनिक प्रक्रियेवर अवलंबून असते मात्र तिलाही सेंद्रिय शेतीची जोड दिल्यास उत्पादन खर्च निम्म्यावर येतो . आम्ही द्राक्षे शेतीत सेंद्रिय पद्धतीचा वापर केला असता द्राक्षे मणी फुगवण, त्याची साठवणूक क्षमता, गोडी यात आमूलाग्र बदल झाला आहे . यावर्षी द्राक्षे शेतीत सेंद्रिय पद्धतीने उच्चांकी उत्पादन येईल अशी परिस्थिती आहे .

**–रमेश शेळके, सेंद्रिय शेती पुरस्कर्ते**

# भारतीय मजदूर संघाच्या मागणीला मिळाले महत्वपूर्ण यश

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** किमान वेतन कायद्यानुसार किमान वेतन दराचे पाच वर्षे नंतर त्वरित नवीन वेतन दर कामगारांना लागु केले पाहिजेत, असे असताना ही महाराष्ट्र राज्यातील सुमारे ४० अनुसूचित रोजगार मध्ये असलेल्या कामगारांना मागील आठ नऊ वर्षापासून प्रलंबित होते. या बाबतीत भारतीय मजदूर संघाच्या वतीने निवेदने देऊन, वारंवार पाठपुरावा करून, आंदोलन करून कामगारांना महागाईच्या प्रमाणे वेतन देण्यात यावे अशी मागणी केली होती. तसेच २१ डिसेंबर २०२२ मुंबई व २८ डिसेंबर २०२२ रोजी नागपूर येथे कामगारांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी भव्य मोर्चाचे आयोजन केले आहे व मोर्चा मधील महत्वपूर्ण मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सरकारने नुकताच इंजिनीयरींग उद्योग, औषध द्रव्य व औषध बनवाणारे उद्योग, विधी व्यवसाय संबंधित



कामधंदा करिता किमान वेतन पुर्ननिर्धारण करून दर घोषित केले आहे. यानुसार अकुशल १४१७० ते कुशल १६६०५ रू प्रति माहे अधिक महागाई भत्ता, व नियमानुसार ५ टक्के घरभाडे भत्ता प्रमाणे कामगारांना करिता घोषित केला आहे या मुळे या रोजगारातील कामगारांना थोडा फार दिलासा मिळाला आहे. तसेच भारतीय मजदूर संघ संघांने उर्वरित प्रलंबित किमान वेतन त्वरित लागु करण्यात यावे अशी मागणी केली आहे. यामुळे रोजगारातील कायम तसेच लाखो कंत्राटी कामगारांना दिलासा द्यावा अशी मागणी सचिन मेंगाळे यांनी व्यक्त केली आहे. बिडी उद्योगातील कामगारांना किमान वेतनची अंमलबजावणी होत नाही, त्यामुळे बिडी कामगारांच्या करिता प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने ठोस अंमलबजावणी करावी अशी मागणी कार्याध्यक्ष उमेश विस्वाद यांनी व्यक्त केली आहे. या मोर्चा करिता भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा कार्यालयात विविध उद्योगातील पदाधिकारी बैठक संपन्न झाली, व मुंबई येथे मोर्चा करिता नियोजन, तयारी चा आढावा घेण्यात आला, या वेळी उत्साहाच्या वातावरणात हजारो कामगारांनी न्याय मागण्यासाठी, शासनाच्या कामगार विरोधी धोरणाच्या विरोधात हजारो च्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना केले आहे.

# समृद्ध समाजाच्या निर्मितीत संतपीठाची भूमिका महत्वाची

## चंद्रकांत पाटील : आवश्यक निधी उपलब्ध करून देणार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संतपीठामध्ये शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांमधून अनेक विद्यार्थी घडणार आहेत. त्यामुळे समृध्द समाजाच्या निर्मितीमध्ये संतपीठाची भूमिका महत्वाची असून येथील सुविधासाठी शासनाकडून निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. पैठण येथील संत एकनाथ महाराज संतपीठाच्या अभ्यासक्रम प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील बोलत होते. यावेळी पालकमंत्री तथा रोहयो व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.प्रमोद येवले, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च व तंत्रशिक्षण संचालक डॉ. शैलेद्रं देवळाणकर, प्र-कुलगुरु डॉ.श्याम शिरसाट यांच्यासह संतपीठात



विविध अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेले विद्यार्थी तसेच प्राध्यापक यांची उपस्थिती होती. संतपीठाच्या पायाभूत सुविधासह इतर उपक्रमासाठी शासनामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जाणार असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने संतपीठासाठी सामाजिक दायित्व निधी (CSR) च्या माध्यमातून देखील निधी उभा करण्याची सुचना श्री पाटील यांनी केली.

12 व्या शतकानंतर भारत देशावर परकीय आक्रमाणामुळे समाज विखुरला गेला होता. असे असताना संताच्या शिकवणीतून भारताला स्थिरत्व, आत्मविश्वास आणि संस्कारी जीवन पद्धती मिळाली. यातून मानवेतेचे वैश्वीक संदेश दिला गेला. तो वारसा संतपीठ पुढे नेईल. खऱ्या जीवनाचे सार समाधानी जीवन आहे. संत साहित्यातून समाजासमोर आणखी व्यापक स्वरुपात ते येईल असे मंत्री पाटील यांनी सांगितले. पालकमंत्री भुमरे यांनी संतपीठाच्या वसतीगृह व इतर इमारतीची दुरुस्ती व इतर सुविधासाठी दोन कोटी रुपयापर्यंतचा निधी जिल्हा नियोजन समिती मधून देणार असल्याचे सांगितले. तसेच इतर अभ्यासक्रम व अनुषांगिक कामासाठी शासनाकडे पाठवलेला निधीच्या प्रस्तावास मंजुरी मिळावी यासाठी पालकमंत्री यानात्याने पाठपुरावा करणार असल्याचे यावेळी मंत्री संदिपान भुमरे यांनी सांगितले.

# ॲड. दिलीप ठाकूर यांना राजरत्न पदवी प्रदान



आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** सतत पस्तीस वर्षापासून राजकारणात राहून देखील निरपेक्षवृत्तीने समाजासाठी अहोरात्र झटणारे भाजप नांदेड जिल्हा सरचिटणीस धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांचा श्री संत भानुदास महाराज संस्थान येहळेगाव जिल्हा हिंगोलीतर्फे संतांच्या हस्ते राजरत्न पदवी देऊन गौरव करण्यात आला. यावर्षीपासून श्री संत भानुदास महाराज संस्थान तर्फे समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नागरिकांना पुरस्कार देण्याचे ठरविण्यात आले. येहळेगाव येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या समाप्तीला हिंगोली,नांदेड,परभणी, यवतमाळ व वाशिम जिल्ह्यातील गुरुवर्य भानुदास महाराजांच्या हजारो शिष्यांची उपस्थिती होती.

# व्यंकटेश प्रसाद

आधुनिक केसरी

भारताचा माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद बीसीसीआयच्या निवड समितीच्या नवीन अध्यक्षपदी विराजमान होण्याची शक्यता आहेत. बीसीसीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य निवड समितीच्या पदासाठी अर्ज केलेल्यांमध्ये व्यंकटेश प्रसाद हे सर्वात कुशल क्रिकेटपटू ठरले आहेत. त्यांच्याकडे लवकरच नव्या निवड समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. बीसीसीआय नवीन समितीमध्ये मुख्य निवडकर्ता म्हणून टी२० तज्ञाच्या शोधात असल्याची चर्चा आहे. वेंकटेश प्रसाद यांनी आपल्या कारकिर्दीत गोलंदाज म्हणून भारतासाठी ३३ कसोटी आणि १६१ एकदिवसीय सामने खेळले आहेत. त्याच्या खात्यात २९० आंतरराष्ट्रीय विकेट्स आहेत आणि नवीन निवडकर्त्यांच्या पदासाठी अर्ज करणारा तो सर्वात अनुभवी क्रिकेटर आहे. बीसीसीआयच्या जवळच्या सूत्रांवर विश्वास ठेवला तर, या महिन्याच्या अखेरीस नवीन निवड समिती अंतिम केली जाईल आणि त्याची घोषणा केली जाईल. वेंकटेश प्रसाद हा या भूमिकेसाठी अर्ज केलेल्या सर्वात अनुभवी क्रिकेटपटूंपैकी एक आहे. कोणतीही औपचारिक चर्चा झाली नसली तरी निवड समितीच्या अध्यक्षपदी व्यंकटेश प्रसाद यांची वर्णी लागल्याची चर्चा आहे. बीसीसीआयच्या खात्रीलायक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सांगितले जात आहे की, "नवीन निवड समिती अंतिम केली जाईल. या महिन्याच्या अखेरीस नवीन निवड समितीची घोषणा केली जाईल. वेंकटेश प्रसाद हे सर्वात अनुभवी क्रिकेटपटूंपैकी एक आहेत ज्यांनी या पदासाठी आपली नावे नोंदवली आहेत. यावर कोणतीही औपचारिक चर्चा झाली नसली तरी नूतन अध्यक्ष म्हणून त्यांना सर्वांचा विश्वासदर्शक ठराव मिळण्याची शक्यता आहे. प्रसाद यांनी आणखी एक ट्विट करून बीसीसीआयला सल्ला दिला आहे. "आयपीएल सुरू झाल्यापासून आम्ही एकही टी२० विश्वचषक जिंकलेला नाही आणि मागील पाच वर्षांत एखादी द्विपक्षीय मालिका जिंकण्याशिवाय मर्यादित षटकांच्या एकदिवसीय सामन्यांमध्ये देखील फारसे काही केले नाही. त्यामुळे भारतीय संघात बदल आवश्यक आहे." बीसीसीआय निवडकर्ता म्हणून टी२० विशेषज्ञ शोधत आहे. बीसीसीआय चे देखील मत आहे की टी२० क्रिकेट खेळण्याचा अनुभव असलेला निवडकर्ता निवड समितीचा भाग असावा. निवडकर्त्याचा शोध आतापर्यंत पूर्ण झालेला नाही. अशोक मल्होत्रा, जतीन परांजपे आणि सुलक्षण नाईक यांचा समावेश असलेल्या नवीन क्रिकेट सल्लागार समितीला संक्षिप्त माहिती स्पष्ट आहे की 'संघाची पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीकोनातून निवडकर्त्यांची निवड करणे'.

# राज्यांतर्गत सीमावादामुळे देश कमकुवत



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांमध्ये भाजपची सत्ता असून दोन्ही राज्ये आता आमनेसामने आली आहेत. त्याचे कारण म्हणजे पाच दशकांपासून सुरू असलेला दोन राज्यांमधील सीमावाद. महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये दीर्घकाळापासून सीमावाद आहे. सिमा वादाचा प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात असताना देखील या प्रश्नावर दोन राज्यांमधे सीमा वाद मोठ्या प्रमाणात उफाळून येत आहे. महाराष्ट्रातील जत तालुक्यावर दावा सांगत असतानाच कर्नाटकने गुरुवारी या तालुक्यात पाणी सोडून पुन्हा डिवचले. पाणी द्या नाही तर, कर्नाटकात जाऊ असा इशारा देणाऱ्या जतकरांना पाणी देऊन महाराष्ट्रापेक्षा आम्हीच तुम्हाला पाणी देऊ शकतो, हे दाखवण्याचा प्रयत्न कर्नाटकाने केला आहे.**

ईशान्येकडील राज्यांमध्ये सीमावादाचा मुद्दा अनेकदा समोर येतो. मात्र, देशांतर्गत सीमा वादाच्या याविवादात एक दोन राज्ये नव्हे तर तब्बल १२ राज्ये अडकलेली आहेत. राज्यांमधील सीमा प्रश्न इंग्रजांच्या काळातील असून स्वातंत्र्याच्या शतक पूर्तीच्या उंबरठ्यावर येऊन देखील भारताला हा प्रश्न सोडविता आला नाही.

बराच काळ लोटला तरी या आजारावरील औषधाचा शोध लागलेला नाही. या सीमावादांमध्ये रक्तरंजित संघर्षही पाहायला मिळाले आहेत. त्यामुळे याला केवळ वैचारिक मतभेद म्हणता येणार नाही. एक-दोन नव्हे, तर देशातील १२ राज्ये या वादात अडकली आहेत. सीमावादाचा हा गोंधळ त्यांच्या प्रगतीलाही खीळ घालतो. देशाला कमकुवत करतो. राज्य राज्यांमध्ये हिंसा होत आहे.ज्या पद्धतीने सीमा प्रश्न समोर येतो त्यावरून हा संघर्ष अखंड भारतातील राज्यांचा नसून दोन देशांमधील विवाद आहे का अस वाटायला लागलं आहे.राज्यां राज्यांमधील मधील सीमा संघर्षामुळे देश कमजोर होत असून देशाची एकता व अखंडता कमकुवत होत आहे.संवाद व लोकशाही पद्धतीने सीमा प्रश्न सोडविण्याची गरज आहे. जेव्हा राज्यांमधील सीमा विवादांचा विचार केला जातो तेव्हा आसाम आणि ईशान्येकडील राज्ये अनेकदा लक्षात येतात. मात्र, हे योग्य नाही. आंध्र प्रदेश-ओडिशा, हरियाणा-हिमाचल प्रदेश, लडाख (केंद्रशासित प्रदेश)-हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र-कर्नाटक, आसाम-अरुणाचल प्रदेश, आसाम-नागालँड, आसाम-मेघालय, आसाम-मिझोरम यांच्या सीमारेषा आहेत हे सरकारने अधिकृतपणे मान्य केले आहे. विवाद या वादांमुळे समस्या निर्माण होतात. अधिकाराची लढाई सुरू होते. या भांडणामुळे परस्पर दुरावा आणि कटुता निर्माण होते. या सर्व राज्यांतील वादामागील कारण काय आहे हे सर्वप्रथम जाणून घेऊया. यानंतर, तुम्हाला कळेल की याबद्दल चिंता का आहे. ईशान्येकडील सात राज्यांमध्ये आपापसात सीमा वाद जुनाच आहे. आसाम-मेघालय, आसाम-मिझोराम, आसाम-अरुणाचल प्रदेश, मणिपूर-नागालॅण्ड असे विविध राज्यांमध्ये वाद आहेत. आसामचे विभाजन करून नागालॅण्ड, मेघालय आणि मिझोराम या राज्यांची निर्मिती करण्यात आली होती. या राज्यांमध्ये विविध वांशिक आणि बंडखोरांचे गट आहेत. ईशान्येकडील बहुतांश सर्वच राज्यांमध्ये हिंसक संघर्षाची किनार आहे. आंतरराज्य तसेच विविध प्रादेशिक वाद आणि हिंसाचार झाला आहे. आसाममध्ये परकीय नागरिकांच्या मुद्द्यांवर हिंसाचार झाला. नागालँण्डमधील बंडखोर गटाने मणिपूरचा काही भाग नागालँण्डमध्ये समाविष्ट करावा या मागणीसाठी हिंसक संघर्ष केला होता. सात राज्यांची आंतरराज्य परिषद असून या माध्यमातून संघर्ष मिटविण्याचे प्रयत्न झाले आहेत. पण त्याला फारसे यश आलेले नाहीत. आसाम आणि मिझोरामधील हिंसाचार आटोक्यात आणण्याकरिता तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या काळात आसाम आणि मिझो करार करण्यात आले होते.मात्र या राज्यांमधील संघर्ष अधूनमधून उफाळून येतोच.

सीमेबाबत राज्यांचे वेगवेगळे दावे आहेत. याठिकाणी सीमा ही काल्पनिक पद्धतीने नद्या, टेकड्या, नद्यांची खोरी आणि जंगलांद्वारे विभागली गेली आहे. त्यात सुस्पष्टता नाही. आधी भौगोलिक मानली जाणारी ही समस्या आता वांशिक बनली




आहे. जवळपास शंभर वर्षांपासून धुमसणाऱ्या आसाम आणि मिझोराम सीमावादाने आताच डोके वर काढले असे नाही. आसाम पोलिस आणि मिझोराम पोलिसांतील हद्दीबाबत नेहमीच कुरबुरी सुरू असतात. त्यातून किरकोळ स्वरूपाचा हिंसाचार घडत असतो. यावेळची परिस्थिती ही अधिक भयावह आहे. हिंसाचार घडला हे खरे, पण त्याला जबाबदार आम्ही नाही, अशी दोन्ही राज्यांची भूमिका आहे. ईशान्य भारतातल्या ८ राज्यांपैकी आसाम हे दुसरे सर्वांत मोठे राज्य आहे. आसामचे मिझोरामशिवाय मेघालय, नागालँड आणि अरुणाचल प्रदेशबरोबरही सीमावाद आहेत. पण मिझोरामबरोबरचा वाद सर्वाधिक चिघळलेला आहे. पूर्वोत्तर राज्यांमध्ये अशाप्रकारची अशांतता भारताच्या एकात्मतेला धोकादायक आहे. कारण पूर्वोत्तर राज्यांची केवळ दोन टक्के सीमा भारतातील इतर राज्यांशी आहे. उर्वरित सीमा या दुसऱ्या देशांसोबत आहेत. तब्बल ५४८४ किलोमीटर सीमा बांगला देश, म्यानमार आणि नेपाळलगत आहे. या भागांमध्ये चीनची घूसखोरी अलीकडच्या काळात वाढत चालली आहे. यामुळे या भागात भारतातीलच दोन राज्यांमध्ये अशा प्रकारे उफाळणारा हिंसाचार चिंतेचा विषय आहे. याला चीन खतपाणी घालत तर नसेला ना? हा मुद्दा देखील महत्वाचा आहे. पूर्वोत्तर राज्यांकडे सातत्याने झालेले दुर्लक्ष आणि तेथील स्थानिक वादांच्या प्रश्नांत केंद्र सरकारने कधीच हस्तक्षेप केला नाही, अशी टीका आता होत आहे. आता केंद्रात भाजपाचे सरकार आहे. या सरकारने जम्मू कश्मीर मधील कलम ३७० सारखा जटील प्रश्न सोडविण्याचे धाडस दाखविले आहे. त्यादृष्टीने हा विषय किचकट देखील नाही मात्र हा वेळीच सोडविला नाही तर भविष्यात त्याचे गंभीर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत. २०१९ मध्ये जम्मू-काश्मीरचा राज्याचा दर्जा जाऊन त्याचे दोन केंद्रशासित प्रदेश केले गेले. यावरून एक लक्षात येईल की, या बाबतीतले अधिकार संसदेला आहेत. राज्यघटनेच्या तिसऱ्या कलमाने संसदेला राज्यांच्या सीमा ठरवण्याचा, बदलण्याचा, नवीन राज्य निर्माण करण्याचा, राज्याचा दर्जा काढून घेण्याचा अधिकार संसदेला दिला आहे. यामुळे मोदी सरकारने हा वाद सोडविणे आवश्यक आहे. आता एकीकडे आसाम पोलिसांनी गोळीबार करणाऱ्या मिझोराम पोलिसांच्या अधिकाऱ्यांना चौकशीसाठी नोटीस पाठवली असताना मिझोराम पोलिसांनी थेट आसामच्या मुख्यमंत्र्यांविरोधातच गुन्हा दाखल केला आहे. यामुळे हा वाद चिघळण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. परिस्थिती अजून स्पोटक बनण्याआधी केंद्र सकारने यात हस्तक्षेप करुन सामजस्यांने हा विषय हाताळणे आवश्यक आहे. २४ जुलैला केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी ईशान्येतल्या मुखमंत्र्यांची शिलाँगमध्ये बैठक घेतली होती. त्याच्या दुसऱ्याच दिवशी, म्हणजे दोन्ही राज्यांच्या पोलिसांमध्ये संघर्ष झाला आणि आसामचे सहा पोलीस मृत्यूमुखी पडले. दोन्ही राज्यांचे मुख्यमंत्री याबद्दल वेगवेगळे दावे करतात. यावरुन आता राजकारण सुरु झाले आहे ते वेगळेच! काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शहा यांच्यावरच निशाणा साधत हिंसाचारास जबाबदार ठरविले आहे. अमित शहा लोकांमध्ये द्वेषभावना पसरवत आहेत, असा आरोप त्यांनी केला. संसदेतही या हिंसाचाराचे पडसाद उमटले. आता या प्रश्नांत केंद्र सरकारला निर्णायक भूमिका घ्यावी लागेल असेच दिसते. मोदी सरकारने या भागात विकास कामांना सुरुवात केली आहे, हे कुणीही नाकारु शकत नाही. मोदी सरकारची ही भुमिका निश्चितच स्वागतार्ह आहे. हे करत असतांना पूर्वोत्तर राज्यांमध्ये एकोपा निर्माण करण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम राबविण्याची गरज आहे.

# मराठवाडा साहित्य संमेलनाच्या निमित्ताने



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**बेचाळीसावे मराठवाडा साहित्य संमेलन संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी जि. जालना येथे १० आणि ११ डिसेंबर २०२२ रोजी संपन्न होत आहे. या संमेलनाच्या निमित्ताने मराठवाड्यातील बहुतांश मराठी साहित्यिक आणि रसिक साहित्याचा आनंद घेत आहेत. ही खरेतर सुखावणारी, स्थल-काल हरवून साहित्याच्या विश्वात रममाण करणारी गोष्ट असावयास हवी. परंतु मराठवाड्यातील साहित्यिकांना असे हरवून जाणे परवडणारे नाही. कारण आपले स्थळ मराठवाडा आहे. जो निजाम राजवटीपासून मागासलेपणाची भळभळती जखम घेऊन विकासाची आतुरतेने वाट पाहत आहे.**

मराठवाड्याला साहित्याची फार मोठी परंपरा लाभली आहे. ही परंपरा अगदी सातवाहन राजा हल यांच्यापासून आपणांस दाखविता येईल. मराठी साहित्याचा आरंभच मुळात मराठवाड्यात झाला आहे. मुकुंदराज, महदंबा, भास्करभट्ट बोरीकर, खळोबास, कवी नरेंद्र, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर आणि भावंडे, गोरा कुंभार, विसोबा खेचर, जगमित्र नागा, संत एकनाथ, दासोपंत, संत रामदास, मुक्तेश्वर, वामन पंडित, विठ्ठल बीडकर, कृष्णदयार्णव, वा. रा.कांत, बी. रघुनाथ, नरहर कुरुंदकर अशी एक भव्य परंपरा मराठवाड्याला लाभली आहे. ात आधुनिक साहित्यिकांचे नावे घेत बसू तर जागा अपुरीपडेल. निजामाच्या पारतंत्र्यात असताना येथील साहित्याने त्याविरोधी धोरण घेऊन जनमानस जागे करण्याचा आणि स्वातंत्र्यवेदीची ज्वाला धगधगती ठेवण्याचा प्रयत्न केला. कारण स्वातंत्र्यात मुक्तपणे जगता येईल, आपला विकास साधता येईल ही प्रांजळ भावना यामागे होती. नागपूर करारानुसार विदर्भ सशर्त सामील झाला, पण आम्ही कोणत्याच अटी अथवा शर्थी न ठेवता महाराष्ट्रात सामील झालो. कारण एकच, आपण मराठी आहोत व आपला विकास महाराष्ट्रातच होईल ही अपेक्षा. खरेच आपला विकास झाला का हे पडताळून पाहण्याची वेळ येऊन ठेपली आहे. भौतिक सधनता आणि साहित्य याचा काही अर्थाअर्थी संबंध आहे का? असाही प्रश्न जिज्ञासूंना पडू शकतो. मग विकासाची भूमिका कोणी मांडायची? हिंदी साहित्यातील प्रसिद्ध कवी रामधारी सिंह उर्फ दिनकर यांनी पंडित नेहरूंना उद्देशून म्हटले होते, जब जब राजनीती लडखडाएगी, तब तब साहित्य उसे संभाल लेगा. दिनकर किती मोठे कवी होते हे त्यांच्या रश्मीरथीवरून सहज लक्षात येईल. त्याच न्यायाने मराठवाड्यातले राजकारण लडखडू लागले आहे, त्याला धीर देण्याचे, चार शहाणपणाच्या गोष्टी सांगण्याची जबाबदारी साहित्याची आणि साहित्यिकांची आहे. उगीचच बोडक्या माळरानावर बसून गर्द हिरव्या रानातला मोहरून गेला वारा, मनातल्या मोरपिसांचा फुल-फुलला फुलोरा, अशा काव्यपंक्ती प्रसविण्याची खरेच काही गरज नाही. या महाराष्ट्रातील सीमाप्रश्न पहिल्यांदा साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरूनच ग. त्र्यं. माडखोलकर यांनी मांडल्याचे उदाहरण आपल्या समोर आहे. आपण भावनोत्कटतेत कमी नाही, शब्दकळेत कमी नाही. त्याची तर फार मोठी परंपरा आमच्या पाठीशी आहे. आम्ही कमी पडतो ते फक्त स्वाभिमानात. कारण शतकानुशतके गुलामीत गेलेले आमचे वास्तव्य आम्हांस आमचाच आवाज बाहेर येऊ देत नाही. २०१३ साली मराठवाड्यात भीषण दुष्काळ पडला होता. तसा तो आम्हाला जाणवला नाही. कारण सीलबंद पाण्याच्या बाटल्या आता गावोगाव मिळू लागल्या आहेत. तर तेव्हा न्यायालयाने गोदावरीचे पाणी जायकवाडीत सोडण्याचा आदेश देऊनही पश्चिम महाराष्ट्राने आपणांस पाणी मिळू दिले नव्हते, ही काही फार जुनी गोष्ट नाही. आपल्याकडील नेत्यांनी त्यांच्यासारखी एकजूट दाखवली असती तर कदाचित हा प्रश्न तेव्हाच मार्गी लागला असता. आपण मराठवाड्यातील लोक दररोज नीळ-टिनोपाल घालून तालुक्याला येतो म्हणजे विकसित झालो, हा आमचा गैरसमज आहे. देशातील शंभर अविकसित जिल्ह्यात आमचे जालना, बीड, उस्मानाबाद आणि हिंगोली असे चार जिल्हे येतात. मॉडेल्स कॉलेजची स्थापनाच मुळात त्या निकषांवर झाली आहे. कारण शिक्षणाविषयी अति उदासीनता हे आमचे वैशिष्ट्य ठरू पाहत आहे. शिकून रोजगार नाही, नोकरी नाही म्हणून आणखी उदासीनता. आज मराठवाड्यातील शिक्षण घेतलेला तरुण जागतिक स्पर्धेत टिकेल का? असा आमच्यासमोर प्रश्न आहे. शैक्षणिक दर्जात सुधारणा करून उच्च शिक्षणाचा टक्का वाढवणे हे आमच्यासमोर फार मोठे आव्हान आहे. केवळ शिक्षणच नव्हे तर सिंचनाच्या बाबतीतही आम्ही पिछाडीवर आहोत. मराठवाड्यातील ८४४३ गावांपैकी साधारण २५०० हजार गावात रब्बी पिके घेतली जातात. महाराष्ट्राच्या स्थापनेपासून आम्ही फक्त ११ लाख ६२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणू शकलो. तेच उर्वरीत महाराष्ट्रात २६ लाख ११ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आहे. त्यामुळे इथला शेतकरी सधन होऊ शकत नाही. परिणामी इतर जी बाजारव्यवस्था आहे तिला चालना मिळत नाही. अजूनही ७० टक्के जनता शेतीवर उपजीविका भागवते, दुसरे साधनच नाही. आणि शेती आतबट्ट्याचा मामला असते. सिंचन नसल्यामुळे आकाशाकडे डोळे लावून बसण्याशिवाय गत्यंतर नाही. शेतकऱ्यांची दयनीय अवस्था आहे. सततची नापिकी, वाढते बी-बियानाचे दर आणि कर्ज यामुळे शेतकरी आत्महत्या देखील मोठ्या प्रमाणात होतात. २०१६ पासून २०२२ च्या मध्यापर्यंत ६४०८ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. अगदी जानेवारी ते जुलै २०२२ या सहा सात महिन्यात ५५० शेतकरी आत्महत्या मराठवाड्यात झाल्या. ही मोठी चिंतेची गोष्ट आहे. या सर्व प्रश्नांना घेऊन साहित्याने आलाप आळवले पाहिजेत. कारण इतरांसारखे जगायला आणि लिहायला आम्हाला जमणार नाही. आमचे वास्तव भयाण आहे. भविष्य त्याहून निराळे असणार नाही. कारण केवळ शेतीच नव्हे तर एक औरंगाबाद शहर आणि परिसर सोडला व थोडाबहुत नांदेडच्या आसपासचा भाग वगळला तर उद्योगही नाहीत. केवळ उर्वरित महाराष्ट्राला कामगार पुरवणारा प्रदेश अशी मराठवाड्याची ओळख निर्माण होत असेल तर हे फार भूषणावह नाही. कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेशच नव्हे तर तामिळनाडूपर्यंत ऊसतोड कामगार कामाला जातो. भौतिक विकास नाही म्हणून चघळण्यासाठी काहीतरी विषय असावा म्हणून मग इथला माणूस जात, धर्म, राजकारण यावर न थकता बोलतो. यातून मने दुभंगतात, कलुषित होतात. या मनाला मराठवाड्यातील साहित्याने सांधण्याचे काम अव्याहतपणे केले पाहिजे. जोपर्यंत आम्ही आमचा मुख्य प्रश्न समजून न घेता काहीतरी कपोलकल्पित लिहत असू तर येणारा काळ व पिढी आम्हांस माफ करणार नाही. साहित्य ही काही निर्वात पोकळीत निर्माण होणारी गोष्ट नव्हे. अलीकडे नव्या पिढीतील लेखक या प्रश्नांना घेऊन जागरूक आहेत. त्यांच्या कादंबरी, कथा आणि काव्यातून कधी स्पष्ट तर कधी अस्पष्ट जाणिवा व्यक्त होतात, ही आश्वासक बाब म्हणायला हरकत नाही. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# लत्तनुर ते लातूर : इतिहासाची सोनेरी पाने



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

लातूरचे पुरातत्वीय व्यक्तिमत्व अभ्यासले असता सलग असा इतिहासपट समोर येतो. लातूर परिसरात पूर्व,मध्य व उत्तर अश्मयुगीन सुक्ष्म हत्यारे सापडतात. पी. एन. कांबळे यांनी केलेल्या अन्वेषनात मांजरा खोऱ्यात असे पुरावे सापडले आहेत. शिवाय नवी दिल्ली येथील आंतरविद्यापीठ संशोधन केंद्र आणि अमेरिकेतील अरिझोना या विद्यापीठाने केलेल्या संयुक्त संशोधन मोहिमेत मांजरा खोऱ्यातील काही अस्मिभूत अवशेष सापडले आहेत. तत्कालीन हाडे व दातांचे अवशेषांचा कार्बन डेटिंग पद्धतीने कालानुक्रम ठरविण्यात आला आहे. आणि हा कालावधी ई. सन पूर्व २००० ते २५०० पूर्वीचे असावा, असा अंदाज आहे. (ई.सन.पूर्व २१४२ -२१४३ ते २४३५ , २१२३ ते २४३५ असा कालावधी आहे.) कार्बन डेटिंग पद्धतीने हा कालवधी निश्चित केलेला आहे. मांजरा खोऱ्याचा इतिहास इसवी सन पूर्व २४ हजार पर्यंत मागे जातो. रेडीओ कार्बन, ६४:२ पृ. ३५७-३७५, विजय साठे, प्रतिक चक्रवर्ती, राजवीर शर्मा यांनी हा लेख लिहिला आहे.

लातूर परिसरात ताम्रपाषाणयुगीन तसेच उत्तरकालीन सिंधू संस्कृतीचे अवशेष सापडण्याची शक्यता आहे. तसेच तेर नगरीप्रमाणे लातूर, औसा, निलंगा, उदगीर या ऐतिहासिक नगरातील जुन्या भागांचे उत्खनन केले असता, राष्ट्रकूट पुरातत्त्वावर नवा प्रकाश पडू शकतो. तसेच ऐतिहासिक काळातील लातूर येथील सिद्धेश्वर मंदिर, निलंगा येथील नीलकंठेश्वर मंदिर, तेर येथील त्रिविक्रम मंदिर, अंबुलंगा येथील शिव मंदिरे यांच्या संशोधनात वाव आहे. डॉ. रानडे यांनी निलंगा येथील नीलकंठेश्वर मंदिरातील शिल्पातील सौंदर्यावर प्रकाश टाकणारा शोध निबंध 'इंडियन हिस्टरी काँग्रेस'मध्ये सादर केला होता. डॉ. प्रभाकर देव यांच्या प्रबंधात ही लातूर जिल्ह्यातील काही मंदिरावर प्रकाश टाकण्यात आला आहे. अलीकडे इतिहास अभ्यासात फलनामाच्या इतिहासाला विशेष महत्त्व आहे. प्राचीन काळापासून ते वर्तमान काळापर्यंत एखाद्या शहराचा इतिहास कसा बदलत जातो ते लक्षात घेणे अगत्याचे आहे. या अभ्यासाला नागरी इतिहास असे म्हटले जाते. वैभवशाली प्राचीन कालखंड लातूरचा प्राचीन कालखंड समृद्ध आणि वैभवशाली आहे. प्राचीन काळात दक्षिण पथावर दंडकारण्यात किंवा मराठवाड्याच्या तपवनात वसलेले लातूर शहर परंपरा व लोककथांचे सोनेरी कोंदण घेऊन विकसित झाले आहे. शालिवाहन, सातवाहन काळात टोलीमीने आपल्या भूगोलात नमूद केलेले तगरपूर किंवा तेर या व्यापारी केंद्राचे लातूर हे एक उपनगर होते. पुढे चालून वाकाटक, चालुक्य व राष्ट्रकूट काळात या नगरांचा अधिक विकास झाला. राष्ट्रकूटाच्या काळातील या घराण्याचा संस्थापक दंतिदुर्ग हा गुलबर्गा जिल्ह्यातील मान्येखेत (मलखेड) या गावावरून आपले नशीब उजळण्यासाठी लत्तनूर येथे इ. सन ७२२ पोहोचले. दंतिदुर्गने वेरूळच्या शिलालेखात स्वतःचा उल्लेख 'लत्तनूर नराधीश्वर' असा केला आहे. म्हणजे आपण लातूर गावचे रहिवासी आहोत याचा त्यांना अभिमान वाटतो. दंतिदुर्ग हे मूलतः बदामीच्या चालुक्य यांच्या सेवेत होते. पुढे त्यांनी लातूरहून एलूर (वेरूळ) येथे प्रयाण केले व सुलीभंजन येथे आपली राजधानी उभारली. दंतिदुर्ग इ. स. ७२० च्या सुमारास लातूर येथे आले असावे, असा तज्ञांचा अंदाज आहे. त्यांनी लातूर नगरीची भक्कम उभारणी केली व आपले राजकीय सत्ता केंद्र बनविले. इसवी सन ७५३ ते ९७३ एवढे प्रदीर्घ राज्य राष्ट्रकूट घराण्याने केले. राष्ट्रकूटाचे लातूर हे मूळ केंद्र होते. त्याशिवाय कंधार जि. नांदेड, मुरूम तालुका उमरगा, धारूर जि. बीड, अंबड जि. जालना इत्यादी राष्ट्रकूटांची उपकेंद्रे होती. राष्ट्रकूट नगरामध्ये जलाशयाचे मोठे तलाव, मंदिर नगरे आणि गडकोट उभारण्याची पद्धत होती. राष्ट्रकूटांनी बंगालचे 'पाल' घराणे आणि राजस्थानच्या 'प्रतिहार' घराण्याचा पराभव केला होता. राष्ट्रकूट सम्राट कृष्ण पहिला याने वेरूळ लेणी क्रमांक १६ कैलास लेण्यावर गंगा, यमुना व सरस्वती या नद्यांच्या प्रतिमा कोरल्या आहेत. त्यावरून राष्ट्रकूटाने आपले राज्य किती दूरवर पसरविले होते याची कल्पना येते. डॉ. रमेशचंद्र मुजुमदार यांनी या प्रक्रियेला 'भारतीय इतिहासातील त्रिपक्षीय संघर्ष' असे म्हटले आहे. राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष पहिला याने लातूर शहराचा अधिक विकास केला व आपल्या पूर्वजाविषयी आदरभाव प्रगट केला. त्यांना लातूरचा शिल्पकार असे म्हणता येईल. या काळात काही ठिकाणी लातूरचा उल्लेख 'रत्नापूर' असा ही सापडतो. असे प्राध्यापक हरिहर ठोसर म्हणतात.

**शिक्षणाचे केंद्र लातूरः** शालिवाहन काळापासून देवगिरीच्या यादव काळापर्यंत प्राचीन काळात लातूर हे शिक्षणाचे केंद्र होते. कल्याणीच्या चालुक्य घराण्यातील सम्राट सोमेश्वर तिसरा याचा लातूरच्या पापनाश मंदिरातील शिलालेख महत्त्वपूर्ण पैलूंवर प्रकाश टाकणारा आहे. लत्तनूर हे विद्या व कलेचे माहेरघर होते आणि या नगरीत ५००विद्वान राहत होते व सम्राटाने त्यांचा सन्मान केला, असा उल्लेख सापडतो. सोमेश्वराने लातूर नगरीच्या विकासात महत्त्वाचा हातभार लावला आणि या शहराची पुनर्रचना केली. दंतिदुर्ग व अमोघवर्ष पहिला या सम्राटा प्रमाणेच लातूरला विद्येचे केंद्र बनविण्यात सोमेश्वरांचे योगदान मोठे होते. म्हणजे दंतिदुर्ग, अमोघवर्ष पहिला आणि सोमेश्वर तिसरा हे लातूरच्या विकासाला गती देणारे मोठे तीन सम्राट होऊन गेले. राष्ट्रकूट सम्राट अमोघवर्ष पहिला हा जगातील चार प्रमुख सम्राटांपैकी एक होता असे सुलेमान या अरब प्रवासाने नमूद करून ठेवले आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे अमोघवर्षे पहिल्याच्या काळात लातूर हे संस्कृत भाषा व जैन विद्यांचे केंद्र होते. या काळात जैन, महाराष्ट्री प्राकृत भाषेत काही काव्यग्रंथ लिहिले गेले, असे पुढे मध्ययुगीन चिमणा पंडित या कवीने नमूद केले आहे.



**मध्ययुगीन लातूर :** उत्तर भारतामध्ये सुलतानशाहीचा उदय झाल्यानंतर तेराव्या शतकापासून मुस्लिम संस्कृतीचा प्रभाव वाढू लागला. दक्षिणेत हसन गंगू बहामनी याने गुलबर्गा येथे बहामनी साम्राज्य स्थापन केले. लातूर नगर हे ह्या सत्तेच्या प्रभावाखाली राहिले. पुढे बहामनी सत्तेची विजयपूरचे आदिलशाही, बिदरची बरीदशाही गोवळकुंड्याची कुतुबशाही, अहमदनगरची निजामशाही आणि वऱ्हाडातील इमादशाही अशी पाच शेकले झाली. लातूर मधील पराक्रमी वीरांनी या सत्तेची सेवा केली. पुढे मराठी सत्तेच्या उत्कर्षानंतर लातूर परिसरातील मराठे हे हिंदवी स्वराज्यात सेवा करू लागले. या इतिहासाचे अवशेष उदगीर,औसा,नळदुर्ग तसेच परांडा आणि धारूर येथील किल्ल्यांच्या रूपाने पहावयास मिळतात. १७६० साली मराठ्यांनी निजामाचा प्रभाव करून येष्ट्चे शिखर गाठले ते उदगीरच्या लाधित विजय स्पंदन करून. १७२९ मध्ये दक्षिणेत निजामाची सत्ता स्थापन झाली निजामाच्या असफीया घराण्याने १७२९ ते १९४८ पर्यंत मराठवाड्यावर राज्य केले.

**मुक्तीसंग्रामाचा इतिहासः** हैदराबाद मुक्तीसंग्रामाचा तेजस्वी इतिहास लातूर व उस्मानाबाद जिल्ह्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. लो. टिळकांनी १८८१ साली लातूरला भेट दिली आणि निजामाविरुद्ध असंतोषाचे संघटन केले. तसेच सहकारी तत्त्वावर लातूरमध्ये जिनिंग प्रेसिंगचा कारखाना मिल सुरू करण्यासाठी त्यांच्या प्रयत्नामुळे मोठे यश आले. लातूर मधील सहकारी चळवळीचा पाया सुद्धा लोकमान्य टिळकांनी घातला असे म्हणता येईल. आर्यसमाज, हिंदू महासभा आणि हैदराबाद स्टेट काँग्रेसचे मुक्तीसत्याग्रहात उस्मानाबाद व लातूर जिल्हा अग्रेसर होता. लातूर येथे झालेल्या महाराष्ट्र परिषदेमध्ये शेतकरी व शेतमजूर तसेच विणकरांचा मोर्च्या काढण्यात आला. महिलांचेही स्वतंत्र संमेलन झाले. स्वामी रामानंद तीर्थ यांचे अनुवयी असलेले देवीसिंग चौव्हान, नारायण लोहारेकर, बाबासाहेब परांजपे राजवेन्द्र दिवाण, कॅप्टन जोशी, वेंकटराव नळदुर्गकर, विश्वंभर हराळकर, तात्यासाहेब मोरे, श्रीनिवास मुगळीकर, रामराव राजेश्वरकर इत्यादी स्वातंत्र्य सैनिकांनी मुक्तीसंग्रामाच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात महत्त्वाचे कार्य केले. पहिल्या टप्प्यात सामाजिक व सांस्कृतिक जागृती घडवून आली, तर दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष संघर्ष केला. रजाकार चळवळीचा प्रमुख काशीम रझवी हा ही लातूरचाच राहणारा होता. उजव्या, डाव्या, मध्यममार्गी सर्व राजकीय प्रवाहांचे दर्शन लातूरच्या स्वातंत्र चळवळीत दिसून येते. ग्रंथालय, व्यायाम शाळा, राष्ट्रीय शिक्षण संस्था या रूपाने लातूर हे चळवळीचे केंद्र बनले.

प्राचीन काळापासून ते १७ सप्टेंबर १९४८ च्या मराठवाडा मुक्ती दिनापर्यंत लातूरचा इतिहास मोठा रोमांचकारी व स्फूर्तीदायक आहे. तसेच प्राचीन लातूरचा इतिहास सोनेरी पानाची साक्ष देणार आहे. मध्ययुगात प्रतिकूल परिस्थितीवर मात करत लातूरकरांनी आपले सत्त्व व स्वत्व टिकविले. हैदराबाद मुक्तिसंग्रामात लातूर येथे झालेल्या परिषदेतील विचार मंथन मुक्ती संग्रामात धवल यशाकडे घेऊन जाणारे ठरले. प्राचीन काळात लातूर जसे विद्याचे केंद्र होते. तसेच आजही शिक्षणाचे केंद्र म्हणून उदयास आले आहे. लातूरचा भूतकाळ जसा तेजस्वी आहे तसाच भविष्यकाळ हे निश्चितच उज्वल आहे. इ.सन. ७२२ मध्ये दन्तिदुर्गाने लातूर शहरात प्रवेश केला. त्याला पंधराशे वर्ष पूर्ण होत आहेत. लातूर येथे महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अधिवेशन होत आहे, त्या निमित्त्याने हा लेख.

# साथ...



सौ. मनीषा कांदळकर
मु. पो. ता. येवला, जि. नाशिक

आधुनिक केसरी

'सीता' आवर पावसाचे दिवस तोंडावर आले. रानातील काश्या, काडी कचरा गोळा कर. वावर निर्मळ करावं लागल. सखू अक्काला सोबत घे रोज देऊन टाकू असं म्हणून राम वावरात निघाला. मृग नक्षत्र दोन दिवसांनी सुरू होणार होते. त्याआधी या काळ्या आईचा आशीर्वाद घ्यायचा व धान्याच्या राशी पडू दे, तुझी लेकरं सुखी ठेव असं दरसाल नित्य-नियमाने राम धरणी आईचे आशीर्वाद घ्यायचा. राम पाठोपाठ भाकरीची टोपली व कमरेवर कळशी घेऊन सिताही वावरात गेली. दिवसभर ओणवं होऊन काडी कचरा काट्या गोळा केल्या. वावरात नजर टाकली आज आपल्या लेकरांना पाहून धरणी आईची काया चमकत होती.

संध्याकाळी येऊन चुलीवर चहा टाकला तेवढ्यात रामही हातपाय धुवून आला. बियाण्यासाठी लागणाऱ्या पैशाची चिंता सतावत होती. मागच्या सालचं कर्जाची हप्ते रोजंदारीवर भरत होता. यंदाच्या साली पाऊस पडेल व निम्मे तरी कर्ज फेडू या आशेवर कंबर बांधून कष्ट करण्यास तयार होता. सीतालाही आपल्या नवऱ्याची काळजी समजत होती. आज काळेकुट्टं आकाश पावसाचे संकेत देत होती. थोड्याच वेळात पावसाचे टप टप थेंब पडायला लागले. मुसळधार पाऊस सुरू झाला. वावरातून पाणी वाहायला लागले जमिनीची तृष्णा शांत होईस्तोर धो धो पाऊस पडला. सर्व शेतकरी बांधवांना योग्य वेळी पाऊस पडल्याने आनंदाचे भरते आले. राम तर वरूण राजाला नमस्कार करून आभार मानत होता. दोन दिवसात पेरणी करावी लागेल पैशाची काय तजवीज करावी या विचारात तो पडला. आपल्याला पैसे तरी कोण देईल अन् परतफेडीचा भरोसा तरी कसा द्यायचा या विवांचनेत तो बसलेला बघून सीतेच्या लक्षात आले, बियाणासाठी पैशाची तजवीज करावी लागेल. ती घरात गेली, कानातील झुमके काढले व बाहेर आली. रामला म्हणाली, "तुम्ही उद्या बियाणे घेऊन या! उद्याचा दिवस वावर सुकू देऊ व परवा सऱ्या पाडून पेरणी करू..." तो म्हणाला सगळं खरं आहे पण बियाण्यासाठी पैसे नाही. काळ्या आईच्या कृपेनं सालभरचं दाणे, कडधान्य, मिरची पिकतं पोटाला शिजवून खातो म्हणून जगतोतरी पण पैसा कुठून आणायचा, मागच्या साली कर्ज काढलं. सालभर राब राब राबलो माल पिकवला पण कोरोना आला अन् मातीमोल भावानं माल विकला. खर्चाची तोंड मिळवणी केली पण शिल्लक काहीच नाही. आता बी भरण मुश्किल झालं. सीता म्हणाली "काळजी करू नका! हे डूल घ्या, सोनाराकडे गहाण ठेवा आणि पैसे आणा. पीक झाले की आणू सोडून." तिच्या मोकळ्या कानांकडे त्याने बघितलं तो म्हणाला नको मी करतो तजवीज तशी राधा म्हणाली, "दुसऱ्याकडे हात पसरणार दोन दिवसात तो तगादा लावणार, त्यापेक्षा थोड्या दिवसात कानात काही नसलं तर काही फरक पडणार नाही. दुसऱ्या दिवशी राम शहरात बियाणे आणण्यासाठी गेला. संध्याकाळी मकाची पिशव्या, बाजरी, बी भरण घेऊन आला. दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत वावर सुकले त्यांनी सऱ्या पाडल्या व संध्याकाळी दमून घरी आला. सीतानं गरमा गरम भाकरी दुध अन् ठेचा दिला. पोटभर जेवण करून अंथरुणावर आडवा झाला. उद्या पहाटे लवकर उठून औताला जुपायचे होते. दमल्यामुळे त्याला शांत झोप लागली. सकाळी लवकर उठून न्याहारी करून बैलं घेवून सऱ्या पाडल्या पाठोपाठ रोजंदारी लावून मकाही टाकली. बाजरी ही पेरून झाली. सांजवेळी बैलांना वैरण टाकून तो निवांत ओट्यावर बसला. सीताला म्हणाला, "आज पेरणी झाली मनावरचं ओझं कमी झालं. उद्यापासून आपण दोघेही रोजंदारीने कामाला जाऊ म्हणजे खादीचे पैसे जमा करू. राधानं लवकर उठायचं म्हणून जेवण करून लवकर झोपली.



दोन दिवस रोजंदारीचे काम लागले. परंतु दोन दिवस कडक ऊन पडल्याने पेरणी थांबली तसे कामही थांबले. जमिनीतील ओलाव्यावर आठ दिवसांनी बी अंकुरले व मका डोलू लागली. तसा राम खुश झाला आभाळाकडे बघून म्हणाला, "देवा कृपा कर आता तरी पाऊस पडू दे!" रोज वर आभाळाकडे पाहायचा पण पाऊस पडण्याची काही चिन्ह दिसेना. पंधरा दिवस झाले आता पिकाने मान टाकली. दुबार पेरणीचं संकट रामला दिसू लागले तसा तो खचला त्याचे अवसान गळाले. कष्ट करण्यास उभारी घेतलेले मन खचू लागले. संध्याकाळी तो गुडघ्यात मान घालून बसला नवऱ्याचे हे अवसान बघून सीताच्या मनात कालवा कालव झाली. कशी उभारी देऊ या विचारात ती रामजवळ गेली अवं! असं काय बसलात वर मान करा, "मी काय तुम्हाला खचू देणार नाही, पाऊस काय आज नाही उद्या येईन आपल्याला मरून थोडी देणार हाय दोन दिवस वाट बघून नाही आला तर वखरून पुन्हा बी टाकू. पैशाची काळजी करू नका. ते कानातले मोडून टाका त्याची उधारी देऊन पुन्हा बियाणं आणा कानातले काय पुन्हा करता येतील. ही काळी आई एक दिवस सोनं उगवल मग आपलं दिस फिरतील, मग सलापचं घर बांधु, ट्रॅक्टर घेऊ, पोरास्नी तालुक्याच्या शाळेत पाठवू अन् साहेब करू असा धीर नाय सोडायचा. तसाच संपत सीताचं ते रूप बघून तिचे हात हातात घेतले, तू आहे ना साथीला मग खचायचं नाय, नाही पाऊस आला तर पुन्हा पेरणी करू. पीक जोमाने काढू तसा सीताचा चेहरा उजळला, व्हंय! चला जेवून घेऊ. नव स्वप्न घेऊन दोघेही सोबत घरात गेले.

# दोन वर्षे स्नेहसंमेलने नकोच

आधुनिक केसरी

**सर्वच शाळांमध्ये दिवाळीच्या सुट्टी नंतर लगबग सुरू होते ती स्नेहसंमेलनाच्या तयारीचे. त्याचे पडघम खरं तर दिवाळीच्या अगोदरच वाजण्यास सुरुवात होते. म्हणजे मुलांना विविध प्रकारचे नृत्य, नाटक,एकांकिका वगैरे वगैरे बसवण्यास सांगितले जाते. मुलं ही आवडीने ते करण्यास सुरुवात ही करतात. त्यांना त्यातच जास्त आनंद असतो.अभ्यासाकडे आपले दुर्लक्ष होत आहे या कडे ना त्यांचे ना त्यांच्या पालकांचे लक्ष असते. तसेच शाळांचे ही म्हणणे असते की ह्या गोष्टी व्हायलाच पाहिजेत. इतर को-करिक्युलर गोष्टी आल्या पाहिजेत.**

या स्नेहसंमेलनाचे कुठे तीन दिवस तर कुठे चार पाच दिवस कार्यक्रम चालू रहातात. पण या चार पाच दिवस चालणाऱ्या कार्यक्रमासाठी अगोदरचे पंधरा वीस दिवस आणि कार्यक्रमा नंतर दहा एक दिवस मुले आणि शिक्षक रंगलेल्या कार्यक्रमाच्या चर्चेतून बाहेर येतच नाहीत. प्रत्येक जण झालेल्या कार्यक्रमाच्या मांडव झळा लागाव्यात तसा असतो. या वर्षी व पुढील वर्षी सुध्दा तीन चार दिवसांचे स्नेहसंमेलन घेऊच नये असे वाटते.अगदीच घ्यायचे असेल तर वार्षिक पारितोषिक वितरण समांभ तेवढा करुन निवडक कार्यक्रम दोन दिवस ठेवायला काही हरकत नसावी. कमी वेळात व वेळेचा अपव्यय टाळून असे करता येईल. मा. माध्यमिक, प्राथमिक शिक्षणाधिकारी, न.पा.प्रा.शि.मंडळ शिक्षणाधिकारी यांनी याकडे लक्ष दिल्यास बरे होईल. गेली दोन ते तीन वर्ष कोरोनाने पूर्ण पणे विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. हे तर कुणी मान्य करायलाच तयार नाहीत असे एकंदर दिसून येते.सलग दोन वर्षे पहिली ते आठवीच्या शाळांना पूर्णपणे सुट्ट्या होत्या. या काळात विद्यार्थी शाळे पासून व शिक्षकां पासून कोसो दूर होता.या काळात त्याने घरात काय दिवे लावले हे ही माहिती नाही. ऑनलाईन पाठ टाकून शिक्षक मोकळे होत होते.शाळेत समोर मुले असून नीट अभ्यास करीत नाहीत, आणि ते घरी आणि ते ही मोबाईल वर बघून काय करणार?पण त्या लेकरांनी घरी केले आहे की नाही हे कोणी पाहिले आहे.आई वडील कोरोनाच्या क्वारंटाईन, लॉकडाऊन,लसीकरण, प्रत्यक्ष ठिकाणी लाईनला लागणं, यामुळे आर्थिक परिस्थिती मेटाकुटीला आली होती.अशात घरात एखादा जरी पेशंट असला तर घरच्या सर्वांची अवस्था काय होत होती ते आपण पाहिले आहे. मला फक्त येवढच म्हणायचं आहे की प्रत्येक या पहिली ते आठवी विद्यार्थ्यांकडे प्रचंड दुर्लक्ष केल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले



आहे. इयत्ता नववी दहावी या वर्गातील मुलांना शाळेत बोलाऊन काही दिवस मुलांच्या उपस्थित प्रमाणे व प्रमाणातच बोलावून अध्यापन केले गेले. ते ही शालेय चार पाच तासाचे नियोजन करुन. आणि अवघड विषयाचे तास घेऊन. त्यामुळे ह्या विद्यार्थ्यांना सुध्दा पूर्ण वेळ अध्यापन करता आले नव्हते.हे ही सत्य आहे.

मग अशा विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा काय असणार?नववीच्या गुणांवर पास झालेल्या मुलांचा कसा काय बारावीला निभाव लागेल. पुढचं तर त्याहून अवघड.पण याकडे सुज्ञांनी लक्ष घालणे गरजेचे आहे. शिवाय पालकांनीच शाळांना आटोपते आटोपशीर कार्यक्रम ठेवायला सांगणे गरजेचे आहे.

मी काही मुलांना लिहायला सांगितले होते. ती मुले तिसऱ्या इयत्तेत शिकणारी होती. या मुलांना स्वतःचे नाव नीट लिहिता येईना. ते ही मराठीत. इंग्रजीत तर लांबची गोष्ट आहे. पालक खाजगीत म्हणतात होय हो कोरोनाच्या काळात फार दुर्लक्ष झाले. आता चौथी पाचवी सहावीला असणारे विद्यार्थी हे ह्या कोरोनाच्या कचाट्यात सापडलेले आहेत. आत्ताच पालकांनो जागे व्हा.आपल्या पाल्यांसाठी शिक्षण महत्वाचे आहे की नाच गाणी महत्त्वाचे आहे. हे तुम्हीच ठरवा. दोन वर्ष मुलं नाचली नाहीत म्हणून काही बिघडणार नाही. पण दोन वर्षाचा अभ्यास बुडला तो भरुन काढूयात असं ठणकावून शाळांना सांगा.हुशार विद्यार्थ्यांना याचे काही देणे घेणे नसते.सामान्य कुटुंबातील मुलांना अभ्यासाला वेळ देण आणि घरी करुन घेणं हे ही तितकच महत्त्वाचे आहे. शाळा या गोष्टी विद्यार्थ्यांसाठी करतीलच असे नाही. प्रत्येक खुर्चीवरच्या माणसाला वाटत की, माझ्या काळात चांगले कार्यक्रम झाले पाहिजेत. ते व्हावे या बद्दल दुमत नाही पण विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान ही भरुन काढण्याची जबाबदारी आपलीच आहे,हे लक्षात घ्यावे. क्लासेसवाल्यांवर सोडून मोकळे होऊ नये. हवं तर स्नेहसंमेलनातील वाचलेला निधी शाळेतील फर्निचर, बाथरुम व्यवस्था, मुलींसाठी नॅपकिन व्यवस्था, ग्रंथालय सुसज्जता, प्रयोगशाळा सुधारणा, गरजू विद्यार्थ्यांना मदत,असे काही कार्यक्रम वाचलेल्या निधीतून करता येतील. येवढं सगळ केवळ आणि केवळ कोरोनाच्या महामारीत झालेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीची अत्यंतिक जाणीवेतून जाणिवपूर्वक लिहित आहे. मुलांमुळे आपण आहोत ही खुणगाठ मनाशी बांधली तर हेच काय काहीही होऊ शकेल. अन्यथा कार्यक्रमात मिरवायला आपण मोकळेच आहोत!!नाही का!!?

**दत्ता तरलगट्टी, माजी मुख्याध्यापक**

# आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**दरवर्षी 9 डिसेंबर जगभरात आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन म्हणून ओळखला जातो. देशातील नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराविरूद्ध जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.आपल्यापकी प्रत्येकाने एकदा तरी हा शब्द दुर्दैवाने अनुभवला असेल - तो म्हणजे भ्रष्टाचार!**



आजच्या काळात भ्रष्टाचार ही कोणत्याही एका विशिष्ट देशाची समस्या नाही तर जगभरातील प्रत्येक देशाची समस्या आहे. 31 ऑक्टोबर 2003 ला संयुक्त राष्ट्र महासभेने एक प्रस्ताव मांडला ज्यात आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार दिन साजरा करण्याची घोषणा केली. त्यानंतर संपुर्ण जगात हा दिवस आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार दिन म्हणून साजरा करण्यास सुरूवात झाली.

भ्रष्टाचार ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे. भ्रष्टाचार या शब्दाची उत्पत्ती भ्रष्ट व आचार या दोन शब्दांच्या एकीकरणातून झाली असून भ्रष्ट असे आचरण म्हणजे भ्रष्टाचार. व्युत्पत्तीशास्त्रानुसार व्यक्तिगत स्वार्थासाठी व्यक्तिने सदसदविवेकबुद्धी गहाण टाकून केलेले वर्तन म्हणजे भ्रष्टाचार होय.

स्वतःच्या वैयक्तिक लाभासाठी मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर करणे, औपचारिक नियम किंवा कायद्यांचे उल्लंघन करून सार्वजनिक सत्तेचा व्यक्तिगत फायद्यासाठी उपयोग करणे म्हणजेच भ्रष्टाचार करणे होय.

समाजात आज प्रत्येक क्षेत्रात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे भ्रष्टाचार सुरु असलेला आपण नेहमीच पाहत असतो. सर्वच क्षेत्रात मग ते राजकीय क्षेत्र असो , निवडणुका, बांधकाम व्यवसाय, प्रशासकीय क्षेत्र, आर्थिक क्षेत्र, धार्मिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, बँकिंग क्षेत्र, विविध उद्योग असो, अशा प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचार वाढलेला आपल्याला दिसून येतो.

प्रत्येक वर्षी भ्रष्टाचार विरोधी दिवससंबंधी एक थीम असते. मागच्या म्हणजे २०२० या वर्षी 'यूनाइटेड अगेंस्ट करप्शन' या थीम अंतर्गत हा दिवस ओळखला गेला तर या वर्षी, आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिन 2021 ची थीम आहेः "तुमचा अधिकार, तुमची भूमिकाः भ्रष्टाचाराला नाही म्हणा."

आज प्रत्येक देश कोविडच्या आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक दुष्परिणामाने पोळून निघाला आहे. कोविडच्या प्रभावाखाली, शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करणे सर्वानाच कठीण होऊन बसले आहे. अशा परिस्थितीत भ्रष्टाचाराचा सामना करण्यासाठी प्रत्येक वैयक्तिक भागधारकाचे अधिकार आणि जबाबदाऱ्या अधोरेखित करणे महत्त्वाचे आहे, ज्यामध्ये सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्र, कायदा अंमलबजावणी संस्था, नागरी समाज संघटना, मीडिया हे सर्व समाविष्ट आहे.

**भ्रष्टाचाराची प्रमुख कारणे :** सत्ता, अधिकार आणि स्थानाचा गैरवापर करणे हा भ्रष्टाचाराचा व्यापक अर्थ आहे. त्याचबरोबर लाच घेणे व देणे, वशिलेबाजी, काळा बाजार करणे, प्रमाणापेक्षा जास्त नफा कमावणे आदींचाही भ्रष्टाचारात समावेश होतो. जगण्याच्या वाढत्या गरजा व लोकांची बदलणारी मानसिकता हे भ्रष्टाचाराचे प्रमुख कारण आहे. महागाई, तुटपुंजा पगार, दारिद्र्य, बेकारी, दिवसेंदिवस वाढणाऱ्या गरजा,इत्यादी घटकांमुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढीस लागले आहे. कोणत्याही मार्गाने पैसा मिळवला तरी चालेल, असा दृष्टिकोन रूढ झाला आहे. प्रशासकीय कार्यकालीन कामकाज पद्धती ही दीर्घ मुदतीची आणि गुंतागुंतीची असते. यामुळे लाच देऊन लवकर कामे करवून घेण्यात लोकांची वृत्ती वाढत असल्याचे दिसून येते.

वर उल्लेखलेल्या कारणांव्यतिरिक्त मानवी स्वभाव आणि विविध वृत्ती - प्रवृत्ती हे भ्रष्टाचाराचे मूळ कारण आहे. लोभी स्वभाव, स्वार्थीपणा या मानवी स्वभावातील सहज प्रवृत्ती आहेत. नेमक्या याच वृत्तींना माणूस बळी पडतो आणि मग तेव्हा चांगल्या-वाईटाचा विचार न करता माणूस भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंबतो. भ्रष्टाचाराची कारणे ही प्रत्येक ठिकाणी , काळाप्रमाणे आणि परिस्थितीप्रमाणे भिन्न असली, तरी वर उल्लेख केलेली कारणे सर्वसाधारणपणे सार्वत्रिकरीत्या आढळून येतात.


**भ्रष्टाचार निमूर्लन योजना :** इ. स. १९४७ मध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा संमत करण्यात आला. स्वातंत्र्यानंतर ३० पेक्षा जास्त समित्या किंवा आयोग अस्तित्वात आले. केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांची प्रशासनातील गतिमानता, पारदर्शकता वाढविण्यासाठी तसेच जनतेच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक या क्षेत्रांत असणाऱ्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी हे धोरण योजले होते. त्यानुसार विविध समित्या व आयोग स्थापन करण्यात आले.

उदा., सचिवालय, पुनर्गठन समिती–१९४६; मितव्ययिता समिती–१९४७; अय्यंगार रिपोर्ट–१९४९; गोरवाला रिपोर्ट–१९५१; पॉल एच. एपलबी रिपोर्ट–१९५२; संथानम समिती–१९६२; पहिला प्रशासकीय सुधार आयोग–१९६६; दुसरा प्रशासकीय सुधार आयोग–२००५; संस्था-अंमलबजावणी संचालनालय (ईडी) –१९५६; सी. बी. आय.–१९६१; केंद्रीय दक्षता आयोग–१९६४; कायदे : भारतीय दंड संहिता–१८६०; भारतीय आयकर अधिनियम–१९६१; लोकायुक्त–१९७१; भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम–१९८८; मनी लॉंडरिंग कायदा–२००२; माहितीचा अधिकार अधिनियम–२००५.

आज देश-विदेशांत भ्रष्टाचारविरोधी कडक कायदे असले तरी एकविसाव्या शतकात समाजामध्ये भ्रष्टाचाराच्या समस्या कायम आहेत. आपली सक्षम कायदे व्यवस्था आणि भ्रष्टाचार विरोधी कार्यरत यंत्रणा तर अहोरात्र सरसावून काम करत आहेच पण त्याच बरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की भ्रष्टाचाराचे उच्चाटन केवळ कायदेशीर किंवा व्यवस्थापकीय पुनर्रचनेमुळे होऊ शकत नाही तर त्याचबरोबर सामाजिक नीती मूल्यांची जाण वाढवणे ही गरजेचे आहे.

व्यापक पातळीवर फक्त सुशिक्षितच नाही तर खऱ्या अर्थाने सुसंस्कृत, सभ्य व भ्रष्टाचारमुक्त समाज निर्माण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, ही बाब प्रत्येकानी मनात रुजविणे गरजेचे आहे.

# चटका लावणारी एक्झिट !



आधुनिक केसरी

जेष्ठ रंगकर्मी मोहनदास सुखटणकर यांचे वयाच्या ९३व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे निधन तमाम रसिक चाहत्यांना चटका लावून गेले. त्यांच्या निधनाने साहित्य, संस्कृती क्षेत्राचे खुप मोठे नुकसान झाले आहे. मुळचे ते माशेल, गोवा हे त्यांचं गाव त्यांचं प्राथमिक शिक्षण देखिल माशेल व म्हापसा येथे झाले .पुढे मॅट्रिकच्या परीक्षेसाठी ते १९५० मध्ये मुंबई येथे आले.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांनी नाट्यसृष्टीत पाऊल ठेवले. दि गोवा हिंदू असोसिएशनच्या उभारणीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता.असोशिएशनच्या माध्यमातून त्यांनी केलीली नाट्य सेवा रसिकांच्या कायम स्मरणात राहील. अभिनय व नाट्य चळवळीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. दि गोवा हिंदू असोसिएशनच्या नाट्य प्रवासामध्ये त्यांचे स्थान उच्च आहे.

नाटक, चित्रपट, मालिकांमधून त्यांनी आगळा वेगळा ठसा उमटवला आहे. कलेवर त्यांचे नित्सिम प्रेम होते. रायगडाला जेव्हा जाग येते, मत्स्यगंधा, लेकूरे उदंड झाली. अखेरचा सवाल, दुर्गी, स्पर्श, आभाळाचे रंग, अशा महत्वपूर्ण नाटकांमध्ये त्यांनी काम केले. याचबरोबर कैवारी, जावई माझा भला, चांदणे शिंपीत जा, थोरली जाऊ, वाट पहाते पुनवेची, जन्मदाता, पोरका, प्रेमांकुर, निवडुंग, अशा मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले. सुखटणकर यांना राजहंस प्रतिष्ठान या संस्थेतर्फे राजहंस पुरस्कार आम्ही गोवेकर या प्रतिष्ठित संस्थेकडून जीवनगौरव पुरस्काराने गौरवले आहे. रंगभूमीवर नितांत श्रद्धा व कायम निष्ठा असणारे व्यक्तिमत्त्व होते. जेष्ठ नाट्यकर्मी मोहनदास सुखटणकर यांचे निधन हे चटका लावून गेले. त्यांनी केलेली नाट्यसेवा रसिकांच्या कायम स्मरणात राहील त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

संतोष दत्तू शिंदे,
मु.पो.काष्टी, ता. श्रीगोंदे, जि.अ.नगर
महाराष्ट्र, मो.७७२१०४५८४५

# कोणत्या चार संस्थांकडे पारितोषिकांचे अधिकार ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**मृत्युपत्रामध्ये कोणकोणत्या कार्यक्षेत्रात व कोणकोणत्या निकषांवर पारखून पारितोषिके द्यावीत, याचे आल्फ्रेड नोबेल यांनी विवेचन करून ठेवले होते. त्यासाठी आवश्यक ते स्पष्टीकरण करणारे नियम व प्रशासकीय तपशील हे मृत्युपत्राचे विश्वस्त, पारितोषिके देणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी व त्यांचे कुटुंबीय यांनी चर्चा करून तयार केले आणि स्वीडनच्या राजाने याला इ.स.१९०० साली मान्यता दिली. अधिक माहितीसाठी श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींचा हा लेख जरूर वाचाच...**

नोबेल पारितोषिक हा जगातील अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, साहित्य, जागतिक शांतता, वैद्यकशास्त्र वा जीवशास्त्र आणि अर्थशास्त्र या पाच क्षेत्रांतील अतुलनीय कामगिरी किंवा संशोधन यासाठी प्रतिवर्षी हा पुरस्कार दिला जातो. स्वीडिश वैज्ञानिक आल्फ्रेड नोबेल यांनी आपल्या मृत्युपत्रात या पुरस्कारांची तरतूद केली होती. त्याच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनी इ.स.१९०१मध्ये पहिल्यांदा हा पुरस्कार देण्यात आला. दरवर्षी १० डिसेंबर रोजी हा पुरस्कार दिला जातो. सन १९४०-४२पर्यंत दुसऱ्या महायुद्धामुळे हा पुरस्कार खंडित करण्यात आला होता. डिसेंबर २०२०पर्यंत एकूण ९२९ व्यक्तींना आणि २५ संस्थांना एकूण ९५४ नोबेल पारितोषिके देण्यात आली आहेत. इ.स.१९६९पासून आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मरणार्थ स्वीडनच्या मध्यवर्ती रिक्स बँकेने अर्थशास्त्रातील मौलिक कार्यासाठी सहावे नोबेल पारितोषिक देण्यास सुरुवात केली. आल्फ्रेड नोबेलच्या मृत्यूनंतर इ.स.१८९७ साली त्यांचे मृत्युपत्र उघडून पाहण्यात आले व चार वर्षांनंतर ते कायदेशीर असल्याचे सिद्ध झाले. या मृत्युपत्रानुसार त्याने कमावलेल्या अमाप संपत्तीचा मोठा हिस्सा- ३.१ कोटी स्वीडिश क्रोनार नोबेल निधीसाठी ठेवलेला होता. हा निधी सुरक्षित ठेवींत गुंतवा आणि मिळणाऱ्या उत्पन्नाच्या ६०-७० टक्के रकमेचे पाच सारखे भाग करून प्रत्येक क्षेत्रातील पारितोषिकासाठी द्या, असे त्यांनी आपल्या मृत्युपत्रात सुचविले होते.

कायदेशीरपणे नमूद केलेल्या व पारितोषिके देणाऱ्या संस्थांनी नेमून दिलेल्या व्यक्तीच पारितोषिकांसाठी उमेदवारांची नावे सुचवू शकतात. स्वतःच आपले नाव सुचविल्यास ती व्यक्ती आपोआपच पारितोषिकासाठी अपात्र ठरते. उमेदवारांची नावे सुचविण्यासाठी पुढील व्यक्ती पात्र असतात- आधीचे नोबेल पारितोषिक विजेते. पारितोषिके देणाऱ्या संस्थांचे सभासद. काही विशिष्ट विद्यापीठांचे आणि महाविद्यालयांचे तसेच पारितोषिके देणाऱ्या संस्थांनी खास निमंत्रित केलेले त्या त्या क्षेत्रातील प्राध्यापक. साहित्याच्या पारितोषिकासाठी लेखकांच्या काही प्रातिनिधिक संघटनांचे सभासद. दि स्वीडिश अकॅडमीशी तुल्य अशा संस्थांचे सभासद. शांततेच्या पारितोषिकासाठी आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या काही संसदीय व इतर संस्थांचे सभासद उमेदवारांची शिफारस करू शकतात. उमेदवारांच्या नावाची शिफारस केवळ व्यक्तीलाच करता येते, संस्थेला नाही. मात्र अनेक पात्र व्यक्ती संयुक्तपणे शिफारस करू शकतात. पारितोषिके देणाऱ्या संस्थांकडून पात्र व्यक्तींना नावे सुचविण्याविषयी विनंतीपत्रे पाठविली जातात. त्यांनी संबंधित कागदपत्रांसह आपल्या शिफारशी १ फेब्रुवारीच्या आत पाठवायच्या असतात. १ फेब्रुवारीपासून नोबेल समित्यांचे काम सुरू होते व सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये समित्या आपल्या शिफारशी पारितोषिके देणाऱ्या संस्थांकडे पाठवितात. या संस्था १५ नोव्हेंबरपर्यंत अंतिम निर्णय जाहीर करतात. नावे सुचविली जाण्यापासून ते अंतिम निर्णयापर्यंत होणारे वादविवाद, चर्चा, मतदान आदी बाबतीत गुप्तता राखली जाते. नोबेल पारितोषिकांच्या निर्णयाविरुद्ध दाद मागता येत नाही. साधारणतः ३००० लोक पुरस्कारासाठी नामांकने पाठवतात. त्यापैकी नोबेल समिती फक्त ठरावीक नामांकनेच निवडते.



[विश्व नोबेल पारितोषिक आरंभ दिवस.]

आल्फ्रेड नोबेलच्या मृत्युपत्रान्वये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व अर्थशास्त्र यांतील पारितोषिके दि रॉयल स्वीडिश अॅकॅडमी ऑफ सायन्सेसकडे, वैद्यकशास्त्राचे दि रॉयल कॅरोलिन मेडिको-सर्जिकल इन्स्टिट्यूटकडे, साहित्याचे दि स्वीडिश अॅकॅडमीकडे आणि शांततेसाठी नॉर्वेच्या संसदेने- स्टोर्टिंगने नेमलेली दि नॉर्वेजियन नोबेल कमिटी या चार संस्थांकडे ही पारितोषिके देण्याचे अधिकार आहेत. पारितोषिकासंबंधीचा निर्णय घेण्याचे व जाहीर करण्याचे काम या संस्था करतात. पारितोषिके देण्याचा निर्णय घेण्यास प्रत्येक संस्थेच्या मदतीसाठी तीन ते पाच सदस्यांची समिती असते. या समित्या गरज भासल्यास इतर तज्ज्ञांनाही चर्चेसाठी बोलावू शकतात. पारितोषिकासाठी सुचविण्यात आलेल्या उमेदवाराच्या कार्याचे मूल्यमापन करून या समित्या आपला निर्णय देतात, पण हा निर्णय मानणे संस्थांवर बंधनकारक नसते. मृत्युपत्रातील तरतुदीनुसार नोबेल प्रतिष्ठान स्थापण्यात आले असून ही संस्था नोबेल निधीची कायदेशीर मालक आहे. वरील चार संस्थांच्या सहकार्याने ही संस्था सर्व प्रशासकीय कामे संयुक्तपणे पाहते. इतर सर्व नोबेल संस्था प्रतिष्ठानच्या नियंत्रणाखाली आहेत. मात्र पारितोषिकांच्या निवाड्याशी आणि त्यासंबंधीच्या कार्याशी प्रतिष्ठानचा काहीही संबंध नसतो.

त्यांच्या सरकारतर्फे हा पुरस्कार नाकारण्याचे आवाहन करण्यात आल्यामुळे चार व्यक्तींनी हा पुरस्कार नाकारला होता. यापैकी तीन जर्मन हिटलरमुळे, तर चौथी व्यक्ती रशियन लेखक बोरीस पास्तेर्नाक यांनी साहित्यातील नोबेलमुळे आपले सरकार सूड उगवेल या भीतीपोटी हा पुरस्कार नाकारला. उत्तर व्हियेतनामच्या लु डक थो याने शांततेचा नोबेल हा शांतता प्रस्थापित न झाल्यामुळे नाकारला होता, हे येथे उल्लेखनीय!

# चीनमध्ये शी जिनपिंग यांच्या विरोधात जनक्षोभ



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**शी जिनपिंग हे चीनचेच नाही तर जगातील शक्तिशाली नेते आहेत. चीनमध्ये त्यांच्या विरोधात ब्र काढण्याची कोणाची हिंमत नाही. शी जिनपिंग यांचा चीनवर एकछत्री अंमल आहे. चीनच्या कम्युनिस्ट पार्टीचे तर ते तहहयात अध्यक्ष आहेत. एकप्रकारे ते चीनचे हुकूमशहाच आहेत. चीनमध्ये त्यांच्या विरोधात किंवा त्यांनी घेतलेल्या निर्णयाविरोधात तसेच त्यांच्या धोरणाविरोधात बोलण्याची कोणाची ताकद नाही असे मानले जाते मात्र मागील आठवड्यात या समजुतीला छेद देणारी घटना घडली.**




संपूर्ण जगातून कोरोना हद्दपार होऊ लागला असला तरी चीनमध्ये मात्र कोरोना पुन्हा पाय पसरू लागला आहे. चीनमध्ये दररोज हजारो कोरोनाचे रुग्ण आढळून येत आहेत अर्थात दीडशे कोटी लोकसंख्येच्या मानाने ही संख्या अतिशय नगण्य आहे तरी देखील चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी चीनमध्ये झिरो कोविड धोरण जाहीर केले आहे. या धोरणानुसार चीनमध्ये एक जरी कोविड रुग्ण आढळला तरी संपूर्ण शहरात टाळेबंदी जाहीर करून संपूर्ण शहराची सीमा सील केली जाते. चीनमध्ये सध्या एक दोन नव्हे तर बारा शहरात कोविडने धुमाकूळ घातला आहे त्यामुळे सरकारने ही बारा शहरे पुन्हा लॉक डाऊन केली आहेत. सततच्या लॉक डाऊनमुळे या बारा शहरातील नागरिक हैराण झाले आहे. शहरात लॉक डाऊन लागू असल्यामुळे त्यांना घराबाहेर पडता येत नाहीत. लॉक डाऊनमुळे उद्योगधंदे बंद ठेवावे लागत आहेत त्यामुळे नागरिकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. लॉक डाऊनमुळे लोकांची आर्थिक स्थिती बिघडली आहे. लॉक डाऊनमुळे शाळा कॉलेज बंद आहेत त्याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत आहे एकूणच लॉक डाऊनमुळे चीनमधील जनतेचे जगणे मुश्किल झाले आहे त्यामुळेच शी जिनपिंग यांनी झिरो कोविड धोरण मागे घ्यावे अशी या बारा शहरातील लोकांची मागणी आहे मात्र राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी जनतेच्या या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत त्यामुळेच या शहरातील नागरिकांच्या संयमाचा बांध फुटला आणि ते सरकारच्या या झिरो कोविड धोरणाच्या विरोधात रस्त्यांवर उतरले. या आंदोलनात सर्व गटातील लोक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते त्यात महिला आणि तरुण मुलांची संख्या लक्षणिय होती. विशेष म्हणजे या आंदोलनात राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या विरोधात आंदोलकांनी घोषणा दिल्या. शी जिनपिंग खुर्ची सोडा, कम्युनिस्ट पार्टी सत्ता सोडा अशा घोषणा आंदोलकांनी या आंदोलनात दिल्या त्यामुळे संपुर्ण जगाचे लक्ष आंदोलनाकडे वळले. हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर केला. पोलीस आणि आंदोलक यांची यावेळी मोठी झटापट झाली. हे आंदोलन चिरडून टाका असा आदेशच जिनपिंग यांनी पोलिसांना दिला मात्र आंदोलकांनीही माघार घेतली नाही. या आंदोलकांना पोलिसांनी अटक केली. चीनमध्ये राष्ट्राध्यक्षांविरोधात आंदोलन करणे हा मोठा गुन्हा मानला जातो त्यामुळेच चीनमध्ये खूप कमी वेळा आंदोलने होतात. यावेळी झालेले हे आंदोलन तब्बल १७ वर्षांनी झाले आहे. २००५ साली सरकारच्या विरोधात जनता रस्त्यावर उतरली होती तर त्याआधी १९८९ साली चीनच्या शहरातील तियानामेन चौकात आंदोलन करण्यात आले होते. यावरून चीनमध्ये आंदोलन हे किती दुर्मिळ आहे हे आपल्या लक्षात येईल. अर्थात तिथेही छोटे मोठे आंदोलने होतात. नाही असे नाही मात्र ती जगाच्या समोर येत नाहीत. अर्थात कितीही मोठे आंदोलन झाले तरी ते कसे चिरडायचे हे तेथील सरकारला चांगलेच माहीत आहे त्यामुळे तेथील आंदोलने यशस्वी होत नाहीत. आता झालेले कोविड झिरो विरोधातील आंदोलन देखील यशस्वी होईल असे वाटत नाही . अर्थात हुकूमशहा सत्ताधीशांच्या धोरणाविरोधात रस्त्यांवर उतरून त्यांचा निषेध करणे ही देखील खूप मोठी गोष्ट आहे. यासाठीच या आंदोलकांच्या धाडसाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे.

# शत्रूचा स्वार्थ

आधुनिक केसरी

मंदविष नावाचा एक जुना साप डोंगराजवळील एका छिद्रात राहत होता. तारुण्यात तो मोठा साप होता. जेव्हा तो घालायचाय तेव्हा तो विजेसारखा चमकायचा, पण म्हातारपण मोठ्यांचे तेज हिरावून घेते. म्हातारपणामुळे मंदवीषचे शरीर अशक्त झाले होते. त्याच्या फॅन्स हलत होत्या आणि हिसका मारत असताना त्याचा श्वास सुटला होता. जे उंदीर त्याच्या सावलीपासूनही पळून जायचे ते आता त्याच्या शरीरात अडकून त्याची छेड काढत निघून जायचे. पोट भरण्यासाठी उंदीरही वैतागले होते. जेवणाची कायमस्वरूपी व्यवस्था कशी या उधेदबुनात आरामात करायची यात व्यस्त असायची. एके दिवशी त्याच्या मनात एक उपाय सुचला आणि तो प्रयत्न करण्यासाठी तो दादूर सरोवरच्या काठी गेला.



दादूर सरोवरात बेडकांचा वावर होता. तिथला त्याचा नियम होता. मंदविष इकडे तिकडे फिरू लागला. मग त्याला बेडकांचा राजा दगडावर बसलेला दिसला. मंदविष यांनी "महाराजांचा विजय असो" असे अभिवादन केले.

बेडूक राजा चकित झाला "तू! तुम्ही आमचे शत्रू आहात. माझ्या जयचा नारा का लावताय?

मंदविष विनम्र आवाजात म्हणाला, "राजन, त्या जुन्या गोष्टी आहेत. आता मला तुमची बेडकांची सेवा करून माझे पाप धुवायचे आहे. मला शापातून सुटका हवी आहे. असा माझा नागगुरूंचा आदेश आहे.

बेडूक राजाने विचारले, "त्याने असा विचित्र आदेश का दिला?"

मंदविष यांनी रचलेली कथा सांगितली-

"राजन, एके दिवशी मी बागेत फिरत होतो. तिथे काही मानवी मुलं खेळत होती. चुकून एका मुलाचा पाय माझ्या अंगावर पडला आणि नैसर्गिकरित्या स्वसंरक्षणार्थ मी तो कापला आणि त्या मुलाचा मृत्यू झाला. माझ्या स्वप्नात भगवान श्रीकृष्ण प्रकट झाले आणि त्यांनी मला शाप दिला की वर्ष संपताच मी दगड बनेन. माझे गुरुदेव म्हणाले की मुलाच्या मृत्यूचे कारण बनून मी भगवान श्रीकृष्णांना क्रोधित केले आहे, कारण मुले हे कृष्णाचे रूप आहेत.

खूप विनवणी केल्यावर गुरुजींनी शापातून मुक्त होण्याचा उपाय सांगितला. यावर उपाय म्हणजे वर्षअखेरीस मी बेडकांना माझ्या पाठीवर फिरायला घेऊन जाईन. मंदविषचे बोलणे ऐकून बेडूक राजाला आश्चर्य वाटले. सापाच्या पाठीवर स्वार होण्याचे श्रेय कोणत्या बेडकाला मिळाले आहे?

त्याला वाटले हे एक विचित्र काम असेल. बेडूक राजाने तलावात उडी मारली आणि सर्व बेडकांना एकत्र केले आणि मंदविष बद्दल सांगितले. सगळे बेडूक स्तब्ध झाले. एक म्हातारा बेडूक म्हणाला "एखाद्या बेडकाने सापावर स्वार व्हावे. ही एक अद्भुत गोष्ट असेल. आपण जगातील सर्वोत्तम बेडूक मानले जातील. सापाच्या पाठीवर प्रवास करण्याच्या लोभाने सर्व बेडकांची बुद्धी नष्ट केली. प्रत्येकाने 'हो' ला 'हो' जोडले. मेधकराज बाहेर आला आणि मंदविषला म्हणाला, "सापा, आम्ही तुला मदत करायला तयार आहोत."

त्यानंतर दुसरा विचार आला नाही. मंदविषच्या पाठीवर आठ-दहा बेडूक आले आणि स्वारी सुरू झाली. राजा समोर बसला होता. मंदविषने त्याला इकडे तिकडे फिरायला लावले आणि तलावाच्या किनाऱ्यावर टाकले. मंदविषच्या सांगण्यावरून बेडूक त्याच्या डोक्यावरून गेले आणि पुढे खाली आले. मंदविषने शेवटचा बेडूक खाल्ला.

आता हा क्रम रोजच सुरू झाला आहे. मांडविशच्या पाठीवर दररोज बेडूक स्वार व्हायचे आणि जो शेवटचा उतरला त्याला तो खात असे.

एके दिवशी दुसऱ्या सापाने मंदविशला बेडूक घेऊन जाताना पाहिले. नंतर त्यांनी मंदविषला खूप शिव्या घातल्या "अरे! साप जातीचे नाक का कापतोयस?" मंदविशने उत्तर दिले, "वेळ आल्यावर धोरणाने काम करावे लागते. माझ्यासमोर चांगले-वाईट असा प्रश्नच येत नाही. असं म्हणतात की, अडचणीच्या वेळी गाढवाला बाप बनवावा लागला तरी. मंदविषचे दिवस आनंदात जाऊ लागले. कोणाला कळणार नाही अशा पद्धतीने तो मागचा बेडूक खात असे. बेडकांना स्वतःची मोजणी कशी करावी हे माहित नव्हते, ज्याने मोजणी करून प्रकरण समजून घेतले असते. एके दिवशी बेडूक राजा म्हणाला, "मला असे वाटते की तलावात पूर्वीपेक्षा कमी बेडूक आहेत. काय प्रकरण आहे माहित नाही?

मंदविष म्हणाला, "हे राजा, सापावर स्वार होणारा महान बेडूक राजा म्हणून तुझी कीर्ती दूरदूरपर्यंत पोहोचली आहे. येथून अनेक बेडूक तुमची कीर्ती पसरवण्यासाठी इतर तलाव, तलाव, तलाव येथे जात आहेत. बेडूक राजाची छाती अभिमानाने फुगली. आता त्याला तळ्यात बेडूक नसल्याचं दुःखही नव्हतं. बेडूक जितके कमी असतील तितकाच त्याला आपला झेंडा जगभर फडकत आहे हे समजून जास्त आनंद होईल.

शेवटी तो दिवसही आला जेव्हा सर्व बेडूक संपले. फक्त बेडूक राजा एकटा राहिला. मंदविशच्या पाठीवर तो एकटाच बसलेला दिसल्यावर त्याने मंदविशला विचारले, "मी तलावात एकटाच राहिलो आहे असे वाटते. मी एकटा कसा राहणार?

मंदविश हसला, "राजन, काळजी करू नकोस. तुझा एकटेपणाही मी दूर करीन. असे बोलून मंदविषने बेडकाच्या राजाला गप्पांनी गिळले आणि तलावातील सर्व बेडूक ज्या ठिकाणी नेले होते तेथे त्याला पाठवले.

**बोध : शत्रूच्या बोलण्यावर विश्वास ठेवणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे.**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात मताची किंमत मीठ-मिरची इतकी समजू नका !

## भीमराव परघरमोल : महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**तेल्हारा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, तुमच्या मताची किंमत मीठ-मिरची इतकी समजू नका, असे प्रतिपादन भिमराव परघरमोल (व्याख्याता तथा अभ्यासात फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारा तेल्हारा जि. अकोला) यांनी केले. सविस्तर वृत्त असे की, तळेगाव बाजार ता. तेल्हारा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी विचारपीठावर भिमराव परघरमोल, गोपाल खोपाले, सिद्धार्थ बोदडे, विलास हिवराळे यांची उपस्थिती होती. प्रथम महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला सिद्धार्थ बोदडे यांनी एक श्रद्धांजलीपर गीत सादर केले. त्यानंतर भिमराव परघरमोल आपल्या व्याख्यानात पुढे म्हणाले की, मताधिकार ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भारतीयांना सर्वात मोठी देन आहे. १९१८ ला साउथ ब्युरो कमिशनला केलेल्या मागणी पासून तर १९३२ ला झालेला जातीय निवाडा, पुणे करार व १९५० ला अमलात आलेल्या भारतीय संविधानातील अनुच्छेद ३२५ व ३२६ मधील तरतुदी पर्यंतचे मताधिकाराचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच जाते, असे ते म्हणाले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन विलास हिवराळे यांनी केले तर सूत्रसंचालन धम्मपाल हिवराळे यांनी केले. कार्यक्रमाला महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सम्राट युवा संघटना तथा गावकरी यांनी प्रयत्न केले.

# कृषि प्रदर्शनाचा लाभ घ्यावा : सत्तार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषि मंत्री अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून सिल्लोड येथे दि १ ते ५ जानेवारी २०२३ रोजी मराठवाड्यातील पहिले राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन भरत आहे. यावेळी प्रथमच राज्यातील चारही कृषी विद्यापीठ व महाबीज अकोला हे सहभाग घेणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाचे नवनवीन संशोधित वाण , आधुनिक कृषी यांत्रिकीकरण, ठिबक, तुषार सिंचन प्रणाली, शेतीतील नवनवीन प्रयोग शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. तसेच शेतीला जोडव्यवसाय जसे की पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इत्यादि विषयी मार्गदर्शन मिळणार आहे . सोयगाव तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा दिनांक 1 जानेवारी ते 5 जानेवारी 2023 मध्ये लाभ घ्यावा असे जाहीर आवाहन सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषि अधिकारी एस. जी. वाघ यांनी शेतकऱ्यांना केले आहे.




# पठाण बालसाहित्य पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्रीरामपूर येथील दोस्ती फाऊंडेशनच्या वतीने लोक कलावंत पैगंबरवाशी मजनूभाई शेख यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्ताने पाठयपुस्तकातील कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांना महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण संचालक तथा नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एस. एन. पठाण, सिने अभिनेत्री वसुंधरा शर्मा यांच्या शुभहस्ते अय्युब पठाण लोहगांवकर यांना बालसाहित्य पुरस्काराने स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. अय्युब पठाण यांची आता पर्यंत बारा पुस्तके प्रकाशित असून त्यांची, पाणपोई ही कविता बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रमात समाविष्ठ आहे. या प्रसंगी व्यासपीठावर सिने अभिनेते बाबासाहेब सौदागर, शुभाष सोनवणे, प्राचार्या गुंफा कोकाटे, सुनील गोसावी, रामदास वाघमारे, तसेच दोस्ती फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा जेष्ठ कवी रज्जाकभाई शेख हे व्यासपीठावर हजर होते. आणि पुरस्कार वितरण कार्यक्रमाला साहित्य रसिक हे मोठया संख्येने उपस्थित होते.

# आदर्श विद्यालयात संविधान दिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज




**जळगाव जा :** 26 नोव्हेंबर रोजी तालुक्यातील माणेगाव येथील आदर्श विद्यालयात संविधान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब यांच्या प्रतीमेला पुष्पहार अर्पण करून, संविधानाच्या उद्देशपत्रीकचे वाचण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी संविधानाविषयीच्या घोषणा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्ही.एन. शेगोकार यांनी केले तर स.शि.एस.एस. बावस्कार व एम.टी. नेमाडे सर यांनी संविधाणाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी स्वाती चापके व साक्षी चापके या विद्यार्थिनीनी आपले मनोगत व्यक्त केले तर दहावी वर्गातील शिवाणी इंगळे या विद्यार्थिनीने, जाग येवू दे तुला रं जाग येवू दे, मला तुझ्या रक्तामधला भिम पाहू दे आपल्या दमदार आवाजाने प्रभोधनपर गीत सादर करत भारतीय संविधाना बाबात माहिती दिली. शाळेचे मुख्याध्यापक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष व्ही. एन. गवई सरांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवणपट उलगडून दाखवला तसेच भारतीय संविधान व त्यातील कलमे, तरतूद, मुल्ये, भारतीय नागरिकांचे,अधिकार, कर्तव्य, जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन जी.आर. भुसारी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहा.शिक्षण, जी.एस. झालटे, पी.यू. राजपूत, शाळेची लिपिक बावसकर सर, शंकरराव कारोडे, महादेव उंबरकार यांनी परिश्रम घेतले, तर विद्यार्थ्यांच्या अवलोकणासठी संविधानाची प्रत बाहेर ठेवण्यात आल्या होत्या.




संत कबीर विद्यालय नक्षत्रवाडी, पैठण रोड औरंगाबाद येथील १० वी चा विद्यार्थी चि.यश पांडुरंग गायकवाड याने ८ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय लॉन टेनिस स्पर्धेत यश संपादन केल आहे. याची विभागीय स्तरावर निवड करण्यात आली आहे. त्याच्या या यशाबाबत विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री एस.बी.पवार व मार्गदर्शन करणारे क्रिडा शिक्षक श्री निळ ई.बी. यांच्या हस्ते विद्यालयात पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी चि. यश गायकवाड याचे अभिनंदन केले.


# पौष्टिक तृणधान्य विषयी मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** आगामी येणारे २०२३ वर्ष हे केंद्र सरकारने आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष म्हणून जाहीर केले आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्याला जे पौष्टीक तृणधान्य आहेत ज्यांना इंग्रजीमध्ये MINOR MILLETS म्हणतात यांचा विसर पडला आहे. आजची पिढी जंक फूडच्या मागे लागली आहे, ज्याचे घातक दुष्परिणाम आज आपणाला भोगावे लागत आहे. यासाठी कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने येणारे वर्ष हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. शेतकरी बंधूंनी आपल्या आहारात ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर व राजगिरा यांचा आहारात समावेश करावा व रोगराई पासून दूर राहावे असे आवाहन आपणाला शासनामार्फत करण्यात येत आहे. ज्वारीमध्ये असलेल्या पोषक गुणधर्मामुळे कोलेस्टेरॉल, हृदयविकार सारख्या आजारापासून मुक्तता मिळते. बाजरीत असलेल्या सल्फरयुक्त अमिनो असिड मुले ती लहान मुले व गर्भवती मातासाठी अतिशय उपयुक्त आहे. नाचणी ही मधुमेही व्यक्तीसाठी वरदान ठरते कारण त्यातील ग्लयसेमिक इंडेक्स रक्तातील साखर वाढू देत नाही. भगर हे धान्य कर्बोदके, कॅल्शियम व फॉस्परस या सारखे खनिज द्रव्याचे भंडार आहे. तसेच राजगिरा मध्ये कॅल्शियम व लोहाचे प्रमाण भरपूर असते. ग्लूटेन फ्री असल्यामुळे गव्हाची ॲलजी असणाऱ्या व्यक्तीसाठी राजगिरा हा उत्तम पर्याय आहे. अश्या या सर्वगुण संपन्न तृणधान्यच्या जनजागृतीसाठी तालुका कृषी अधिकारी सोयगाव एस जी वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली सोयगाव तालुक्यात कृषि सहाय्यका मार्फत ठिकठिकाणी याची प्रचार प्रसिद्धी करण्यात येत आहे.



# स्मशानभूमीसाठी लोकस्वराज्य आंदोलनचे उपोषण




आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** लोहा तालुक्यातील गोळेगाव (तपोवन) येथील मातंग समाजाच्या स्मशानभुमीवर कब्जा करणाऱ्या व्यक्तीवर कडक कार्यवाही करण्यात यावे व ७/१२ वर नोंद करून स्मशानभुमी मातंग समाजाच्या ताब्यात देण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी लोकस्वराज्य आंदोलनाच्या वतीने दि. २ डिसेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गोळेगाव येथील नागरिक अमरण उपोषणास बसले असुन, अमरण उपोषणाला सातवा दिवस उजाडला तरीही जिल्हाधिकारी नांदेड हे गोळेगाव (तपोवन) येथील मातंग समाज स्मशानभूमी प्रकरणी उपोषणार्थींच्या मागणीकडे साफ दुर्लक्ष करत आहेत. मातंग समाज स्मशानभूमीवर गावातीलच एका व्यक्तीने घरकुल बांधले असुन याविषयी तक्रार मंडळ अधिकारी व तलाठी यांच्याकडे केले असता चौकशीअंती मातंग समाजाची स्मशानभूमी ही पारंपारिक असल्याचे स्पष्ट झाले असले तरीही मातंग समाज स्मशानभुमीची नोंद ७/१२ वर नसल्याचे कारण दाखवून मातंग समाजाला अंत्यसंस्कार करण्यासाठी मज्जाव केला जात आहे, हा प्रश्न अतंत्य ज्वलंत असतानाही मातंग स्मशानभुमी प्रकरणी जिल्हाधिकारी नांदेड हे दुर्लक्ष करत असल्याचे मत उपोषणार्थीनी व्यक्त केले आहे. मातंग समाजाच्या मयत व्यक्तीवर आमच्या कित्येक पीढ्यापासून त्या जागेवर अंत्यसंस्कार करतो त्या जागेची मातंग समाज स्मशानभूमीची नोंद ७/१२ जोपर्यंत होणार नाही तो पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुद्दत अमरण उपोषण मागे घेणार नाही असा पवित्रा गोळेगाव येथील पारूबाई गायकवाड, सगुणाबाई गायकवाड, देवूबाई गायकवाड,दत्ता गायकवाड, निवृत्ती गायकवाड, सुरेश गायकवाड, खंडू गायकवाड, राजू गायकवाड, शिवाजी गायकवाड, अशोक गायकवाड आदी उपोषणार्थींनी घेतला आहे. तसेच गोळेगाव (तपोवन)मातंग समाज स्मशानभूमी प्रकरणी अमरण उपोषणाला सात दिवस झाले तरीही जिल्हाधिकारी नांदेड हे सदरील मागणीकडे साफ दुर्लक्ष करत असल्यामूळे प्रशासनाला जागे करण्यासाठी लोकस्वराज्य आंदोलन दि. १० डिसेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकस्वराज्य आंदोलन संस्थापक अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवसीय दंवडी आंदोलन करणार असल्याचा इशारा मराठवाडा संघटक संतोष तेलंग, सचिन वाघमारे, नागोराव कुडके, अंकुश गायकवाड, निवृत्ती गायकवाड, बाळासाहेब टिकेकर, माणिक कांबळे, कैलास सुर्यवंशी आदी पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# वर्दीचा माज असलेल्या जालन्यातील पोलिसाला बडतर्फ करा

## धुळ्यात धनगर समाजाचे धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** जालना जिल्ह्यातील एपीआय शिवाजी नागवे यांना पोलीस खात्यातून कायमस्वरूपी बडतर्फ करण्याची मागणी संपूर्ण राज्यातून होत आहे. धुळ्यातही आज धरणे आंदोलन करण्यात आले. धनगर समाज बांधवांवर अमानुष अत्याचार करणाऱ्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची एकमुखी मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांनी केली. या आंदोलनाला धुळे शहराचे महापौर प्रदीप कर्पे व ग्रामीण आमदार कुणाल बाबा पाटील यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला. सकाळी १० वाजेच्या सुमारास क्युमाईन क्लब परिसरात आंदोलन पुकारण्यात आले. त्यात मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते. याप्रकरणी विस्तृत माहिती अशी की जालनाच्या परतूर तालुक्यातील कोकाटे हादगाव येथील धनगर बांधवाच्या घरावर गावातील काही लोकांनी सामुहिक हल्ला करुन दगडफेक केली होती. याबाबतची तक्रार देण्यासाठी गेलेल्या अन्यायग्रस्त लोकांची फिर्याद दाखल करून न घेता उलट त्यांनाच पोलीस कोठडीत डांबून मारहाण करण्यात आली. आष्टी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक शिवाजी नागवे हे फिर्यादी नागरिकांना मारहाण करीत शिवीगाळ करीत आहेत. तसेच आमदार गोपीचंद पडळकर यांच्याबद्दल अपशब्द वापरत असल्याचे व्हायरल झालेल्या रेकॉर्डिंगमधून स्पष्ट दिसत आहे त्यामुळे एपीआय नागवेंना तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी धनगर समाजाच्यावतीने करण्यात आली. जर समाजबांधवांना न्याय मिळाला नाही, तर येणाऱ्या काळात आणखी तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यासंदर्भाचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांनाही देण्यात आले. आजच्या आंदोलनात धनगर समाजाचे नेते सुनील वाघ, भगवान गर्दे, प्रा. विजय पाटील, कैलास गर्दे, हर्षल हाके, गणेश गर्दे, गोरख पाटील, रतिलाल पाटील, छोटू मासुळे, हिलाल मासुळे, योगेश हालगरे, शिवाजी पाटील, बी. एम. पाटील, रवींद्र वाघ, दादाजी पद्मर, गुलाब गर्दे, चुडामण पाटील, नंदू बागले, रुपेश पाटील, विठ्ठल लांडगे ओंकार पाटील, संदिप शिंदे, हरिश पाटील, मोहन देवरे, वनराज गर्दे, सुरेश आयनोर आदी सहभागी झाले होते.

# अग्रणी उत्कृष्ट साहित्य पुरस्कार जाहीर; वसंत खोत, श्रीराम पचिंद्रे, दत्ता जाधव, अनंत सूर, संजय बोरुडे यांचा समावेश



आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** जिल्ह्यातील देशिंग (ता. कवठेमहांकाळ) येथील अग्रणी साहित्य संमेलन समितीचा यंदाचा अग्रणीभूषण पुरस्कार बाबूराव लक्ष्मण बन्ने यांना जाहीर झाला आहे. त्याचबरोबर संयोजकांतर्फे साहित्य क्षेत्रातील विविध प्रकारातील अनेक पुरस्कार जाहीर केले आहेत. एक जानेवारी 2023 रोजी होणाऱ्या अग्रणी साहित्य संमेलनात ते प्रदान केले जाणार असल्याची माहिती संमेलन समितीने दिली.

साहित्य प्रकार आणि साहित्यिकांचे नाव पुढीलप्रमाणेः देशिंग भूषण पुरस्कार बाबूराव बन्ने, अग्रणी उत्कृष्ट समग्र वाङ्मय पुरस्कार प्रा. वसंत खोत (कोल्हापूर), डॉ. श्रीकांत पाटील (घुणकी), साहित्य साधना पुरस्कार श्रीमती वासंती मेरू (पलूस), डॉ. संजय बोरुडे (नगर), उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार श्रीराम पाचिंद्रे (कोल्हापूर), डॉ. स्मिता पाटील (मोहोळ), विशेष काव्यसंग्रह पुरस्कार मनीषा रायजादे-पाटील (मिरज), माधुरी मरकड (नगर), उत्कृष्ट युवा साहित्यिक पुरस्कार दत्ता जाधव (पुणे), परशुराम लोंढे (सांगली), उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार. जयवंत आवटे (कुंडलं), डॉ. भास्कर बडे (वावेर), विशेष कथासंग्रह पुरस्कार डॉ. अनंत सूर (यवतमाळ), साचिन पाटील (सांगली), अग्रणी यशवंत विद्यार्थी सन्मानामध्ये राष्ट्रीय महिला कुस्तीपटू आराधना नाईक, गायक मीराताई सदामते यांचा समावेश आहें. एक जानेवारीला देशिंग येथे संमेलन होत असून यात पुरस्कार वितरण केले जाणार असल्याची माहिती संदीप माने, दिनकर जोशी, उत्तम इंगळे, मनीषा पाटील, विठ्ठल पवार, बंडू कोळेकर, भरत खराडे यांनी दिली.

# तानाजी शिंदे यांना महाराष्ट्र भूषण

आधुनिक केसरी न्यूज



**लोणी खुर्द :** अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे राज्याध्यक्ष तानाजी शिंदे यांना समाजातील अंधश्रध्दा निर्मुलनासाठी केलेल्या कार्याबद्दल महाराष्ट्र शासन छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय वनश्री पुरस्कार प्राप्त निसर्ग मित्र समिती व जयहिंद लोकचळवळ संगमनेर यांच्या संयुक्त विद्येमाने आयोजित राज्यस्तरीय पर्यावरण परिषेदेत दि १० डिसेंबर रोजी स. १० वा. साई पालखी निवारा, शिर्डी येथे सत्कार करण्यात येणार आहे, तानाजी शिंदे यांनी लोणी शाळेवर कार्य केलेले आहे, तानाजी शिंदे यांनी अंधश्रध्दा निर्मुलनावर केलेल्या कामामुळे त्यांची निवड झाल्याचे पदवीधर शिक्षक आमदार सुधीर तांबे व प्रेमकुमार अहिरे शांताराम मगर यांनी कळविले आहे. तानाजी शिंदे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

# नवरदेवाचे कर्तृत्व बघून मुलगी द्यावी : उद्योजक मनोज पवार



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील तेली समाज बांधवानी संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज जयंती निमित्त शनिमंदीर येथुन शिवनगर महादेव मंदिरा पर्यत भव्य रथ यात्रा रॅली काढण्यात आली या वेळी आमदार उदयसिंग राजपुत, माजी जिल्हा परीषद सदस्या संजनाताई जाधव, युवा उदयोजक मनोज पवार, उदयोजक भरत चौधरी ,माजी नगर अध्यक्षा स्वातीताई कोल्हे , माजी नगरसेवक वाल्मीक लोखंडे, रामेश्वर वाघ सुनिल वाघ, पवण सोनवणे ,संदिप घोंगटे यांच्या प्रमुख उपस्थीतीत दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली . यावेळी उदयोजक मनोज पवार बोलताना म्हणाले समाज एकत्र येऊन हितगुज करावी व आडी अडचणी सोडवाव्यात व समाज पुढे न्यावा सध्या लग्नसराईची धामधुम सुरू आहे. नवरदेव नोकरदार वर्गाचे स्थळ बघण्यासाठी धावपळ करत असतो परंतु नवरदेवाचे कर्तुत्व बघुन मुलगी दयावी तो ही नोकरी येवढे पैशे कमावतो माझ उदाहरण आपल्या समोर आहे असे बोलतांनी म्हणाले. या कार्यक्रमाला महीलांचाही मोठा प्रतिसाद होता जयंती निमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. कन्नड शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक भूषण सोनार यांनी रक्तदान केले जयंती निमित्त विविध कार्यक्रम संपन्न झाले शहरातील सर्व नागरीकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या वेळी संदिप बागुल, योगेश खंडागळे, संतोष दारूनकर, उमेश येळेसकर, संतोष बागुल, सचिन राऊत, संदिप घोंगटे, रमेश चौधरी, रमेश काळे रविंद्र तायडे, राहुल वाघ, दिपक राऊत, रमेश उचित गणेश राऊत, कैलास वाडेकर, अजय चौथे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परीश्रम घेतले.



# सा.बां.विभागाचे दुर्लक्ष ; रस्त्याचे डांबरीकरण निकृष्ट

## ग्रामस्थ आक्रमक : अधिकाऱ्यांनी कामावरती येऊन चौकशी करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहर मराठवाडा- खान्देश सीमेला लागुन असलेला सोयगाव तालुक्यातील रस्त्यांची खूप दयनीय अवस्था आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामानंतरही तालुक्यातील एकही रस्ता दळणवळणासाठी चांगल्या स्थित नसल्याने तेथील जनतेला आपण अजूनही पारतंत्र्यात असल्याचे भासते. त्यातच अधिक पैसे कमावण्याच्या उद्देशाने ठेकेदाराकडून सुरू असलेली रस्त्याची कामे दर्जाहीन होत आहेत. तालुक्यातील जामठी ते पिपळा ८०० मीटर व जामठी ते रवळा सहा किलोमीटर स्त्याचे काम चालू सुरू आहे. रस्त्याची कुठलीही साफसफाई न करता तसेच रस्त्यावर डांबर न मारता रस्त्यावरती खडी अंथरण्यात आलेली आहे. या रस्त्याचे डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे होत असल्याने पावसाळ्यात रस्ता वाहून जाण्याच्या भीतीमुळे ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. शासन या रस्त्यासाठी शासनाच्या लाखो रुपये खर्च करीत आहे. दरम्यान या रस्त्याच्या कामावर संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचा एकही अधिकारी वा अभियंता साधा फिरकत नसल्याने या रस्त्याचे काम अतिशय खालच्या दर्जाचे व निकृष्ट होत आहे. कोणत्याही प्रकारची दबाई न करता व डांबराचा वापर न करतांना तसेच दबाई न करता रस्ता तयार होत आहे.

रस्त्याचे काम निकृष्ठ व दर्जाहीन होत असल्यामुळे जामठी येथील ग्रामस्थ चरणसिंग नाईक विजय राठोड आत्माराम पवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकाऱ्यांनी कामावरती येऊन चौकशी करण्याची तसेच रस्त्याचे काम इस्टिमेट प्रमाणे होत नाही तोपर्यंत आम्ही काम सुरू होऊ देणार नसल्याने म्हटले आहे.



# वंदे मातरम् सभागृह विकास कार्याच्या चळवळीचे केंद्र व्हावे : चंद्रकांत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यात ज्यांनी योगदान दिले त्यांचे कार्य आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. वंदे मातरम सभागृहाच्या माध्यमातून या कार्याची माहिती होणार असून वंदे मातरम् सभागृह विकास कार्यात कार्यरत चळवळीचे केंद्र व्हावे, असे मत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. किलेअर्क येथे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील यांच्या हस्ते वंदे मातरम् सभागृहाचे उद्घाटन झाले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सहकारमंत्री अतुल सावे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे, आ. प्रदीप जैस्वाल, आ. उदयसिंग राजपूत आदी उपस्थित होते.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, मराठवाडा मुक्तीसंग्रामासाठी उभारण्यात आलेल्या लढ्यात अनेकांनी आपले बलिदान दिले. शासकीय ज्ञान, विज्ञान महाविद्यालयातील तरूणांनी वंदे मातरम् या घोषणा देत आंदोलनाला सुरूवात केली होती. त्याचठिकाणी उभारण्यात आलेले वंदे मातरम् सभागृह कायम प्रेरणा देणारे ठरेल. सभागृह उत्तम पध्दतीने चालविण्याबरोबरच येथे सामाजिक, शैक्षणिक तसेच प्रबोधनपर कार्यक्रम व्हावेत तसेच आज आज येथे होत असलेली राष्ट्रीय, शैक्षणिक धोरणासंबंधी कार्यशाळादेखील महत्वपूर्ण ठरणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात याबाबतचा समावेश



करण्याबाबत विचारमंथन केले जाणार आहे. जगभरात योग, विपश्यना तसेच भारतीय संस्कृतीचे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी भारतात येतात. अमेरिकेच्या 22 विद्यापीठाचे कुलगुरु नुकतेच याबाबत चर्चा करण्यासाठी मुंबईत येऊन गेले आहेत. योग व विपश्यना याबाबीनाही महत्वाचे स्थान यापुढेही असणार आहे. सहकार मंत्री सावे म्हणाले की, वंदे मातरम सभागृहाच्या माध्यमातून स्वातंत्र्य सैनिकाबद्दलची माहिती नवीन पिढीला मिळणार आहे. सर्व सुविधाने परिपूर्ण असणाऱ्या या सभागृहात विविध उपक्रम होतील. हे सभागृह नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल. विरोधी पक्षनेते अंबादास म्हणाले की, वंदे मातरम सभागृहाचा इतिहास विसरता येणार नाही. वंदे मातरम चळवळीप्रमाणे या वास्तूचा उपयोग करावा. तसेच मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने भरीव निधी द्यावा. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी विधानसभेचे माजी अध्यक्ष हरीभाऊ बागडे, आ.प्रदीप जैस्वाल यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्तविकात उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी म्हणाले, मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्मृतीचे जतन करण्यासाठी वंदे मातरम सभागृह महत्वपूर्ण ठरणार आहे. 43 कोटी रुपयांचा निधी खर्च करुन उभारण्यात आलेल्या या सभागृहामुळे अनेक वर्षाचे स्वप्न पूर्ण झाले आहे. कुलगुरु डॉ. प्रमोद येवले, पोलीस आयुक्त डॉ. निखील गुप्ता, जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय, सिडकोच्या मुख्य प्रशासक दिपा मुधोळ-मुंढे, पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, शिक्षण संचालक डॉ. शेलेंद्र देवळाणकर, सहसंचालक सतीश देशपांडे, शासकीय विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र सातपुते उपस्थित होते.

# मुख्यमंत्री शिवसेनेचे नाहीतच ते भाजपचेच असल्यासारखे वागतात

## जयंत पाटील यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात घडणाऱ्या सगळ्या विषयावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री मूग गिळून गप्प बसले आहेत जे काही आहे ते कर्नाटकचे मुख्यमंत्रीच बोलत आहेत. असा प्रकार महाराष्ट्राने कधीच पाहिला नाही असे स्पष्ट करतानाच सीमा प्रश्न सुप्रीम कोर्टात आहे त्याच्या तारखा लागतील पण हे चित्र जाणीवपूर्वक निर्माण करण्याचा प्रयत्न कर्नाटकचे मुख्यमंत्री करत आहेत आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शिवसेनेचे नाहीतच ते भाजपचेच मुख्यमंत्री असल्यासारखे वागत आहेत. त्यामुळे ते कोणताच बाणेदारपणा दाखवत नाहीत हीच समस्या महाराष्ट्राच्या मनात आहे अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी शिंदे - फडणवीस सरकारवर जोरदार टीका केली. गुरुवारी सकाळी सीमा भागातील लोकांशी संपर्क साधल्यानंतर शरद पवारसाहेबांनी तिथे शांतता असल्याची माहिती दिली. त्यानंतर संध्याकाळी काही घटना घडल्या. त्याचा स्वतंत्रपणे विचार होईलच परंतु पवारसाहेब स्वतः तिकडे येतो बोलल्यानंतर कर्नाटकच्या भाषेत नरमाई आलेली आहे. त्यांनाही लक्षात आले आहे काय होऊ शकते त्यामुळे महाराष्ट्रातील मराठी जनता सीमा भागात आहे. त्या जनतेला त्रास दिला तर महाराष्ट्र त्यांच्या मागे उभा आहे हा एक मोठा संदेश पवारसाहेबांनी दिलेला आहे आणि त्यामुळे आता जास्त अनुचित प्रकार करण्याचे धाडस त्यांचे होणार नाही असेही जयंत पाटील यांनी ठणकावून सांगितले.

सीमा प्रश्नात महाराष्ट्रातील मराठी लोकांना तिथे त्रास होतो आहे, हल्ले होत आहेत त्याबद्दल आवाज उठवायला लोकसभेत संधी दिली जात नाही म्हणजे केंद्रसरकारने एवढे एकाबाजूने काम करणे योग्य नाही असेही जयंत पाटील पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना म्हणाले. सीमा भागातील वादाबाबत खासदारांना बोलू देण्यात आले नाही, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अपमानाबाबत बोलत असताना खासदार अमोल कोल्हे यांचा माईक बंद करण्याचे पाप करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव जरी घेतले तरी दिल्लीला त्रास व्हायला लागला आहे. भाजपच्या सभापतींनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बोलताना थांबवले ही गंभीर व निषेध करणारी बाब आहे असेही जयंत पाटील यांनी सांगितले. सध्या लोकभावनेचा उद्रेक झालेला आहे. लोकं सरकारच्या विरोधात गेली आहेत. सीमा प्रश्नावरुन राज्यातील काही गावातील लोकं कर्नाटक, गुजरात, तेलंगणा या राज्यात जातो बोलत आहेत.




# संताजी जगनाडे महाराज यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्ह्यातील वैजापूर येथे दि.८/१२/२२ रोजी संत श्रेष्ठ संताजी महाराज जगनाडे यांना जयंतीनिमित्त गुरुवार(ता,०८) रोजी येथील संताजी व्यापारी संकुलात शहरातील सर्व क्षेत्रातील नागरिकांनी एकत्र येऊन अभिवादन केले. प्रथम नगराध्यक्ष शिल्पाताई दिनेशभाऊ परदेशी यांनी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. तिळवण तेली समाजाचे अध्यक्ष सीताराम शेठ व्यवहारे, सचिव आर.पी. क्षीरसागर, जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत, भगवान व्यवहारे, पंढरीनाथ शेलार, केशव आंबेकर, रामदास रत्नपारखी, कमलेश आंबेकर, अरुण आंबेकर, दत्ता आंबेकर, विनोद महाले, कृष्णा क्षीरसागर, विनोद महाले, बबन क्षीरसागर यांनी ही पुष्प अर्पण केले. याप्रसंगी शहरातील बरेच नागरिक उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in